❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | बुधवार, दि. २३ सप्टेंबर २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २६९ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये
www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून
दै. संध्याच्या
यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

# दुष्काळ परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी समिती

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची माहिती, MPSC संदर्भातही केली मोठी घोषणा

### चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन



■ मुंबई (दै. संध्या)

मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधताना राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि MPSC च्या विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर महत्त्वपूर्ण माहिती दिली. त्यांनी सांगितले की, राज्याच्या बहुतांश भागात पिके करपली असून पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. यावर उपाययोजना करण्यासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त, MPSC च्या परीक्षांमध्ये 'ऑब्जेक्टिव्ह पॅटर्न' आणण्याच्या विद्यार्थ्यांच्या मागणीवर शासन सकारात्मक असून, आगामी काळात MPSC च्या माध्यमातून विक्रमी पदांची भरती केली जाणार असल्याची मोठी घोषणाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, साधारणपणे बहुतांश भागात दुष्काळी परिस्थिती दिसत आहे, बहुतांश भागांमध्ये पिके करपली आहेत, असे दिसत आहे. काही भागात कापूस असेल, मका असेल, यावर सर्वाधिक परिणाम झालेला दिसत आहे. कोकणात भातावरही परिणाम झालेला दिसत आहे. वेगवेगळ्या पिकांवरचा जो परिणाम होत आहे, त्याची आकडेवारी आमच्याकडे येत आहे. त्याच्या आधारावर उपाययोजना करण्यात येणार आहे. सोबतच पिण्याचे पाणी आणि जनावारांचा चारा यावर देखील लक्ष देण्याचे ठरले आहे.

पिण्याच्या पाण्याचे नियोजन या संदर्भात महानगरपालिका, नगरपालिका आणि इतर ज्या काही आपल्या पंचायत राज संस्था आहेत त्यांच्याकडे पाणी पुरवठा या संदर्भातले नियोजन करण्यात आले आहे. फील्डवरच्या परिस्थितीच्या अनुरूप काही निर्णय घ्यावे लागणार आहेत. त्यासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली आहे. या उपसमितीचे सचिव म्हणून राजेश अग्रवाल काम करतील. ही समिती फील्डवरुन आलेले जे रिपोर्ट असतील त्यावर निर्णय घेतले जातील, सूचना दिल्या जातील आणि मी आणि दोन्ही उपमुख्यमंत्री आम्ही वरिष्ठ लेव्हलचे निर्णय घेऊ, मोठे धोरणात्मक विषय असतील तरच मंत्रिमंडळात घेतले जातील.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी एमपीएससी संदर्भात ज्या सुनावण्या सुरू आहेत, त्यावर भाष्य करताना सांगितले की, आत्ता असे आहे की श्रीमती व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली सुनावणी पार पडत आहे. अतिशय चांगल्या सुनावण्या पार पडत आहेत. ही समिती सगळ्यांचे म्हणणे ऐकून घेत आहे. त्यामुळे थेट विद्यार्थ्यांशी संवाद चाललेला आहे. समितीनुसार काही मागण्या सातत्याने येत आहेत, त्यात ऑब्जेक्टिव्ह पॅटर्नची मागणी होत आहे. या संदर्भात शासनाची भूमिका एवढीच आहे की समिती काम करत आहे आणि त्यांनी जसे सुचवले तसे शासन ते स्वीकारण्यासाठी सकारात्मक असेल फक्त या संदर्भात कमिटीचा रिपोर्ट येणे महत्त्वाचे आहे. अजून एक मुद्दा असा आहे की एमपीएससीमध्ये खूप कमी पदे असतात, त्यात ग्रुप सी साठी पदे कमी असतात. आता पुढची परीक्षा जी होणार आहे त्यात विक्रमी पदे आम्ही आणू. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पहिल्यांदाच अशी परीक्षा घेणार आहोत. त्याच सोबत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जागा रिक्त आहेत, त्या देखील भरण्याचा आमचा विचार सुरू असून कमिटीसोबत आमची चर्चा सुरू आहे. कमिटीचा रिपोर्ट आल्यानंतर आम्ही अंतिम निर्णय घेणार आहोत.

# लालबागचा राजाची स्थापना कोळी बांधवांनी केली, पण आता ते कुठेही नाहीत

### गुणरत्न सदावर्तेंचा VIP संस्कृतीला विरोध

■ मुंबई (दै. संध्या)

ही शान कोणाची, लालबागचा राजाची... असे म्हणत गणेशोत्सवात जगभरात प्रसिद्ध असलेल्या गणेशभक्तांचे श्रद्धास्थान म्हणजे मुंबईतील लालबागचा राजा. मात्र, गेल्या काही वर्षात लालबागचा राजा गणेश मंडळाचं वाढलेलं भव्य प्रस्थ, सेलिब्रिटींचा माहोल आणि मोठी गर्दी, दर्शनासाठी असलेल्या दोन रांगांमुळे गणेश मंडळावर टीकाही केली जाते. त्यावरुन, आता उघडपणे बोलले जात असून ज्येष्ठ अभिनेते जयवंत वाडकर यांनीही नाराजी व्यक्त केली. आम्ही कोळी लोक लालबागचा राजाचं विसर्जन करायचो, पण आता कुठेही दिसत नाहीत असे म्हणत नाराजी व्यक्त केली. आता, ॲड. गुणरत्न सदावर्तेंनीही दर्शनाच्या व्हिआयपी कल्चरवरुन टीका केली आहे. गणपती बाप्पा मोरयाच्या किंवा भक्तांच्या श्रद्धेबाबत किंतु-परंतु नाही. पण, लालबागच्या राजाची कोळी बांधवांनी स्थापना केली, पण आता ते कुठेही दिसत नाही, असे म्हणत सध्या लालबागच्या राजाचं व्हिआयपी संस्कृतीवर भाष्य केलं. या मंडळांच्या विरोधात नाही मात्र ज्या लेकराचे निधन झाले, त्यांची फिर्याद पाहिली तर लालबागच्या राजाचे दर्शनासाठी खूप लांबून ते आले होते. स्थानिक रहिवाशी आणि आम्ही



मिळून काळाचौकी, पोलिस आयुक्त, ॲडीशनल चीफ सेक्रेटरींकडे तक्रार दिली आहे. फ्रिजची लाईट असेल आणि एखाद्या कुटुंबावर बेतते, त्यावर जबाबदारी निश्चित करावी लागेल. त्यामुळे, फक्त FIR घेऊन चालणार नाही. चोऱ्या होत आहेत, मंडळच दोन्ही मृत्यूला कारणीभूत आहे. कारण, एक युवकाचा देखील मृत्यू झाला, त्यामुळे मंडळाला आरोपी केलं पाहिजे, अशी मागणी गुणरत्न सदावर्ते यांनी केली. गणेशोत्सव खूप मोठा व्हावा मात्र त्यामुळे मृत्यू नको. कमीत कमी एक कोटी रुपये बालकाच्या कुटुंबाला द्यावे, युवकाचा मृत्यू झाला त्याला तशाच पद्धतीने मदतनिधी द्यावा, असेही त्यांनी म्हटले. मंडळाने खुशाल नट नट्या आणाव्यात, पत्रकारांना सोडत नाहीत. गणपतीचा उत्सव आहे, नट नट्या यांच्या जाहिरातीसाठी उत्सव नाही. चॅरिटीमध्ये, VIP दर्शन नावाचा प्रकार नाही, मग ते का आणले, ते बंद व्हावे, अशी मागणीही गुणरत्न सदावर्ते यांनी केली.

## थोडक्यात...

### मुख्य आरोपीला पोलिसांचा घेराव

पाटणा : दैनिक संध्या

बिहारमधील जमुई जिल्ह्यात एका बाईकवरून जाणाऱ्या तरुण-तरुणीला काही समाजकंटकांनी रस्त्यात अडवून त्यांच्याशी असभ्य वर्तन आणि छेडछाड केल्याची घटना 19 सप्टेंबरला घडली होती. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्यानंतर देशभरात संताप व्यक्त करण्यात आला होता. बिहार पोलिसांनी काल तीन जणांना अटक केली होती. जमुईतील छेडछाड प्रकरणातील मुख्य आरोपी नंदन यादव याला घेराव घातला, मात्र त्यानं पळून जाण्याचा प्रयत्न करताच पोलिसांनी त्याच्या पायात गोळी मारली. या घटनेत नंदन यादव जखमी झाला असून त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपी नंदन यादव मडवा डोंगरात लपून बसला होता. पोलिसांनी त्याला घेराव घेतला आणि त्याला शरण येण्यास सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र, नंदन यादव यानं पळून जाण्याचा प्रयत्न केला. अखेर पोलिसांनी नंदन यादवच्या पायात गोळी मारली. या घटनेत जखमी झालेल्या नंदन यादवला जमुई सदर रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. पीडित मुलीच्या जबाबानुसार छेडछाडीची घटना 19 सप्टेंबरला सायंकाळी 7 वाजता घडली आहे. पोलिसांनी यापूर्वीच तीन जणांना अटक केली होती. जमुई मधील छेडछाडीचा व्हिडिओ व्हायरल झाला होता.

# ऑक्टोबरमध्ये १०० टक्के इथेनॉलवर चालणारी कार येणार : केंद्रीय मंत्री गडकरी

### E20मुळे गाड्या खराब होत नाहीत



■ मुंबई (दै. संध्या)

इथेनॉल मिश्रित पेट्रोलच्या विक्रीवरून बराच गदारोळ माजला होता. आता पुन्हा एकदा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी इथेनॉलचं समर्थन केलंय. ई२० मुळे गाड्यांचे नुकसान होते असे आरोप करणारे व्हिडीओ, मेसेज व्हायरल झाले होते. त्यानंतर सरकारकडून स्पष्टीकरणही देण्यात आलं. तसंच दिग्गज कंपन्यांनीही ई२०मुळे गाड्या खराब होत नाहीत असं सांगितलं होतं. दरम्यान, नितीन गडकरी यांनी आता इथेनॉलमुळे गाड्या खराब होत नाहीत असं सांगताना १०० टक्के इथेनॉलवर चालणारी कारही लवकरच लाँच होणार असल्याचं म्हटलंय. दिल्लीत एका कार्यक्रमात बोलताना गडकरी म्हणाले की, जगातील १९ देशात इथेनॉलचा वापर केला जात आहे. भारतात कोणत्याही गाडीची तक्रार नाहीये. ऑक्टोबरमध्ये टोयोटा कंपनीच्या इनोव्हा १०० टक्के फ्लेक्स फ्युएलवर चालणाऱ्या कार लाँचिंगसाठी आमंत्रण मिळालं आहे. ही गाडी १०० टक्के इथेनॉलवर चालेल आणि ६० टक्के वीज निर्मितीही करते. पेट्रोलच्या दराशी तुलना केली तर याच्या वापराने पेट्रोल पंचवीस रुपये प्रती लीटर होईल आणि प्रदूषणही होणार नाही.

मक्यापासून इथेनॉल बनवण्याच्या निर्णयामुळे उत्तर प्रदेश, बिहारमधील शेतकऱ्यांना ४५ हजार कोटी मिळाले आहेत. सरकारकडे धोरण आहे त्याला तुम्ही पाठिंबा दिला पाहिजे. २२ लाख कोटींचा ज्यांचा व्यवसाय आहे तो गेला तर गडकरींना शिव्या देतील. पण मला फरक पडणार नाही. आम्हाला शेतकऱ्यांचं भलं करायचंय असंही गडकरी म्हणाले. बाईक टॅक्सी सर्विस वाढत आहे त्यावरही गडकरी म्हणाले की, सर्व राज्यातील परिवहन मंत्र्यांना सांगतोय की गावच्या गरीब मुलांना आणि दुचाकी चालवणाऱ्यांना तुम्ही प्लॅटफॉर्म द्या. महिन्याला २५ रुपये घेतले जातात आणि ज्यांची कार आहे त्यांना रोजगार मिळतो. कमाई होते. कोणत्याही गुंतवणुकीशिवाय देशातील १० कोटी लोकांना रोजगार मिळू शकतो. माझ्या एका सहीनंतर बेंगलोरमधील रॅपिडो कंपनीने ३.५ कोटी लोकांना रोजगार दिला.

# सार्वजनिक स्थळी फटाके वाजवण्यास बंदी

### ध्वनी प्रदूषण मर्यादा ओलांडणाऱ्यांवर कठोर कारवाई, उपकरणं जप्त करा : मुंबई हायकोर्ट



■ मुंबई (दै. संध्या)

मुंबई उच्च न्यायालयानं धार्मिक सण-उत्सव आणि मिरवणुकांदरम्यान होणाऱ्या ध्वनी प्रदूषणाची गंभीर दखल घेतली आहे. उच्च न्यायालयानं काल सुमोटो दाखल करुन घेत सरकारला आज बाजू मांडण्यास सांगितलं होतं. न्यायमूर्ती जीएस कुलकर्णी आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठानं ध्वनीप्रदूषण प्रकरणावर दोनवेळा सुनावणी घेतली. मुंबई उच्च न्यायालयानं धार्मिक सण-उत्सव आणि मिरवणुकांदरम्यान सार्वजनिक स्थळी फटाके वाजवण्यास बंदी घातली आहे. मुंबई हायकोर्टात राज्य सरकारनं बाजू मांडताना परवानगी फक्त मिरवणुकीला देण्यात आली असून ध्वनिक्षेपकांना कोणतीही परवानगी नाही असं म्हटलं. ध्वनिक्षेपकांचा वापर करताना मर्यादेच्या अधीन राहणे बंधनकारक असल्याचं राज्य सरकारनं कोर्टात बाजू मांडताना म्हटलं. तसेच लेसर लाईटच्या वापरला तसेच मिरवणुकीत फटाके फोडायला कोणतीही परवानगी नाही, असं राज्य सरकारकडून उच्च न्यायालयामध्ये स्पष्ट केलं.

राज्य सरकारच्या शांतता क्षेत्रांच्या यादीत रुग्णालय आणि शाळांसह धार्मिक स्थळ देखील शांतता क्षेत्रात मोडतात. मग गणपती मंडप देखील शांततात क्षेत्रात मोडू शकतात मात्र त्यासाठी ते सूचीबद्ध करावं लागेल अशी भूमिका राज्य सरकारनं कोर्टात मांडली. धार्मिक सण-उत्सव आणि मिरवणुकांदरम्यान सार्वजनिक स्थळी फटाके वाजवण्यास बंदी उच्च न्यायालयानं घातली आहे. तसेच ध्वनी प्रदूषणाची मर्यादा उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाईचे तसेच उपकरणांची जप्ती करण्याचे आदेश उच्च न्यायालयानं राज्य सरकारला दिले आहेत. ढोल ताशा पथकांमध्ये हातोड्याने बडवण्यात येणाऱ्या सिलेंडरवर देखील बंदी घालण्यात आली आहे. मंडळांना त्यांना दिलेली परवानगी जाहीर प्रदर्शित करावी लागेल. परवानगी प्रदर्शित न केल्यास ध्वनिक्षेपक लावता येणार नाही उच्च न्यायालयाकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. तसेच भविष्यात परवानगी देताना अनामत रक्कम घेण्याच्या सूचना उल्लंघन समोर आल्यास अनामत रक्कम जप्त करण्याच्या सूचना उच्च न्यायालयानं दिल्या आहेत. ध्वनी प्रदूषण तसेच पर्यावरणासंदर्भात नियमावली स्पष्ट आहे. तरी ध्वनी प्रदूषणाच्या तक्रारी येतात, मग हे थांबवणार कसं? असा सवाल मुंबई उच्च न्यायालयानं राज्य सरकारला विचारला आहे. मुंबईत 91 पोलीस ठाणी असून प्रत्येक पोलीस ठाण्याची भरारी पथक कारवाई करतात अशी माहिती राज्य सरकारनं न्यायालयात दिली.तसेच कायद्यानुसार उपकरण जप्त करण्याची देखील तरतूद आल्याची माहिती राज्य सरकारनं कोर्टात दिली.

> सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयाकडून पंढरपूरच्या वारीचा उल्लेख करण्यात आला. वारी हजारो लोक करतात त्यात टाळ वाजवला जातो आणि तिथे ध्वनी प्रदूषण होत नाही, असं कोर्टानं म्हटलं.

# सरकारच्या तिजोरीवर पहिला हक्क शेतकऱ्यांचा

### *तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश, एकनाथ शिंदेंची माहिती*

■ मुंबई (दै. संध्या)



कॅबिनेटमध्ये दुष्काळावर चर्चा झाल्याची माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. शेतकऱ्यांना मदत झाली पाहिजे यावर चर्चा करण्यात आली. दरम्यान, नुकसान झालेल्या पिकांचे तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना दिल्याची माहिती एकनाथ शिंदे यांनी दिली. मुख्यमंत्री देखील काही भागात स्वतः जातील. मी देखील काही भागात पाहाणी दौरा करणार असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले.

पिकं पावसाअभावी गेली आहेत, शेतकरी संकटात आहेत. बळीराजा अन्नदाता आहे, अशात सरकारच्या तिजोरीवर पहिला हक्क त्यांचा आहे असेही एकनाथ शिंदे म्हणाले. त्याला संकटातून बाहेर काढणं आमचं काम आहे. आपण अनेक वेळेस मदत केली आहे, मदतीच्या आकडेवारीत मी जात नाही. दसरा दिवाळीत संकट आले, अतिवृष्टी आली तेव्हा देखील आपण मदत केली. सरकार गंभीर आहे, मंत्री महोदयांनी त्याची दखल घेतली आहे. अधिकारी बांधावर जाईल आणि नुकसान झालं आहे ते मोजलं जाईल आणि पंचनामे केले जातील. केंद्र सरकारने देखील वारंवार मदत केली आहे असे एकनाथ शिंदे म्हणाले. मी शिवसेनेच्या मंत्र्यांना आपआपल्या भागात जाण्याच्या सूचना दिल्या आहेत असे एकनाथ शिंदे म्हणाले. सगळ्या गोष्टींवर चर्चा झाली आहे, येणाऱ्या.1 ते 2 महिन्यात सरकार म्हणून मदत करेलच मात्र शिवसेना देखील मदतीला धावेल असे एकनाथ शिंदे म्हणाले. शिवसेना देखील काही जबाबदारी घेईल असेही ते म्हणाले. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडलं जाणार नाही असेही ते म्हणाले. पिण्याच्या पाण्याचे संकट आहे, चाऱ्याचा प्रश्न आहे याचे नियोजन केले जाईल. जनावरांच्या चाऱ्यांना देखील प्राधान्य दिलं जाईल असेही ते म्हणाले.

एकनाथ शिंदे यांनी सर्व मंत्र्यांना शेतकऱ्यांच्या बांधावर जाण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच नुकसानीच्या पिकांचे तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना देखील अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. गावागावात जनता दरबार घेण्याच्या सूचना देखील एकनाथ शिंदे यांनी मंत्र्यांना दिल्या आहेत. शिवसेनेचे प्रत्येक मंत्री ग्राऊंड झिरोवर उतरले पाहिजेत असे मंत्र्यांना आदेश देण्यात आले आहेत. उद्यापासूनच कामाला लागा अशा सूचना एकनाथ शिंदे यांनी मंत्र्यांना दिल्या आहे. राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आज मंत्रीमंडळाची महत्वाची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पार पडली. त्यानंतर एकनाथ शिंदे बोलत होते.



# संपादकीय

## दुष्काळाची चाहूल
### मदतीची प्रतिक्षा

आपल्या महाराष्ट्र राज्यात अनेक भागात पावसाचे प्रमाण अत्यंत असमान असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. पावसाळ्यात पडणारा पाऊस हा केवळ शेतीचा आधार नाही तर ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या चक्राला गती देणारा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. पावसाने दडी मारली की त्याचा परिणाम शेताच्या बांधाच्या पलीकडे जातो. आणि संपूर्ण ग्रामीण जीवन व्यवस्थेला त्याची तीव्र झळ बसते. यंदाच्या पावसाळ्यात पावसाच्या अनिश्चिततेमुळे महाराष्ट्रातील विदर्भ मराठवाडा. सह महाराष्ट्राच्या अन्य भागात दुष्काळ सदृश परिस्थिती निर्माण होत असल्याचे चित्र आहे. पिके संकटात आली की रोजगार कमी होतो. दैनदिन मजुरीची कामे थांबतात.आणि हातावर पोट असलेल्या गरीब कुटुंबासमोर दैनंदिन उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होतो. अशावेळी गाव सोडून रोजगाराच्या शोधात पुणे मुंबई छत्रपती संभाजीनगर. नाशिक या ठिकाणी अनेक कुटुंबे रोजगारासाठी स्थलांतरित होताना दिसत आहेत. दुष्काळाची खरी तीव्रता सरकारी पर्जन्यमानाच्या आकडेवारीवरून मोजता येत नाही. विहिरीच्या पाण्याची खालावलेली पातळी. आटणारे जलस्त्रोत. पिकांची झालेली हानी. जनावरांच्या चा-याचा प्रश्न. रोजगाराची कमतरता आणि वाढणारे कर्ज याचा एकत्रित परिणाम म्हणजे दुष्काळ. त्यामुळे शासनाने दुष्काळ जाहीर करण्याच्या पारंपारिक निकषाबरोबर ग्रामीण भागातील कुटुंबाच्या प्रत्यक्ष आर्थिक परिस्थितीचे मूल्यमापन करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात भूमीहीन. शेतमजूर अल्पभूधारक शेतकरी आणि असंघटित कामगारांना या दुष्काळाचा व त्यामुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा मोठा फटका बसतो. गावात काम नाही. घरात उत्पन्न नाही. दैनदिन अत्यावश्यक खर्च मात्र सुरू असतो.घरातील साठवलेली पुंजी संपल्यानंतर दैनंदिन खर्च भागवण्यासाठी कर्जाचा आधार घेतला जातो. आणि शेवटी गावातून शहराकडे रोजगारासाठी स्थलांतराचा निर्णय घेतला जातो. मराठवाडा आणि विदर्भातील अनेक कुटुंबासाठी हा अनुभव नवा नाही.ऊसतोड. वीटभट्टी . बांधकाम क्षेत्र किंवा अन्य हंगामी रोजगारासाठी कुटुंबासह गावातून स्थलांतर करावे लागते. गाव सोडले म्हणजे समस्या सुटत नाही त्या वेगळ्या स्वरूपात समोर येतात. स्थलांतरित कामगारांना शहरात आल्यानंतर मजुरीतील अनिश्चितता. ठेकेदारावरील अवलंबित्त्व असुरक्षित कामाचे वातावरण. आणि अपुऱ्या निवासाची व्यवस्था. शहरातील गुन्हेगारीचे वातावरण या समस्या सहन करावा लागतात. कुटुंबासह स्थलांतर झाल्यानंतर मुलांच्या शिक्षणात खंड पडतो. आरोग्य लसीकरण अन्नसुरक्षेचे नियम प्रश्न निर्माण होतात महिलांवर घरकाम मुलांची जबाबदारी आणि मजुरी अशी अनेक पातळ्यावरची जबाबदारी येते. त्यामुळे स्थलांतरामुळे केवळ रोजगारासाठी गाव सोडणारे कामगार म्हणून पहाणे हे चुकीचे ठरणार आहे. त्यामागे एक मोठे सामाजिक आणि मानवी संकट दडलेले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी केंद्रीय मंत्री शरदराव पवार यांनी महाराष्ट्रात दुष्काळ जाहीर करण्याची व शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक सहकार्य करण्याची मागणी केलेली आहे. शासनाने तातडीने सर्वप्रथम दुष्काळग्रस्त भागात महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू केली पाहिजे. मजुरांना गावातच रोजगार मिळाला तर शहराकडे स्थलांतराची गरज मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. मजुरी वेळेवर मिळणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देत दुष्काळग्रस्त भागात टँकर विहिरी अधिग्रहण जलस्तोत्राचे पुनर्भरण आणि आवश्यक त्या ठिकाणी तात्पुरत्या पाणीपुरवठ्याची व्यवस्था केली पाहिजे. याशिवाय जनावरासाठी चारा छावण्या चारा उपलब्धता आणि पशुधनाच्या आरोग्याची व्यवस्था याकडेही दुर्लक्ष करता येणार नाही. रोगराई होणार नाही. पिकाचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने पंचनामे करून आणि दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आवश्यक आर्थिक मदत मिळणे गरजेचे आहे. त्याचबरोबर प्रत्येक दुष्काळप्रवण जिल्ह्यात तालुक्यात गावात स्थलांतर पूर्व आणि स्थलातरानंतरच्या कृतीचा आराखडा तयार करून गावातून किती कुटुंबे शहराकडे रोजगारासाठी स्थलांतरित झालेली आहेत. ती मंडळी कोणत्या जिल्ह्यात रोजगारासाठी गेलेली आहेत. त्या ठिकाणी कोणत्या प्रकारचे काम करत आहे. त्यांच्या मुलांची शाळा आणि आरोग्य सेवा कशी सुरू राहील याची माहिती प्रशासनाने संकलित केली पाहिजे. स्थलांतरित कामगारांची नोंदणी आणि त्यांच्या मूलभूत हक्काचे संरक्षण प्रशासनाने संरक्षण यंत्रणात्मक पद्धतीने केले पाहिजे आणि त्वरेने झाले पाहिजे. ऊसतोड कामगारांच्या शोषणाविरोधात साखर आयुक्तालयाने घेतलेली भूमिका त्या दिशेने महत्त्वाची पायरी आहे. मात्र या ठिकाणी नुसते शासकीय कारवाईचे इशारे देऊन पुरेसे होणार नाही. त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होते की नाही याची खातरजमा प्रशासनाने केली पाहिजे कामगारांच्या मजुरी पासून त्यांच्या निवास. आरोग्य आणि सुरक्षिततेच्या बाबीची नियमित तपासणी झाली पाहिजे. तरच शासनाच्या कायद्याचा सर्वसामान्य जनतेमध्ये धाक निर्माण होईल. दुष्काळासाठी लढताना दीर्घकालीन उपायाकडे पहावी लागेल.जलसंधारण. शेततळी बंधारे.नाला बंडीग. गावतळ्याचा गाळ काढणे. भूजल पुनर्भरण सूक्ष्म सिंचन आणि पाण्याचा काटकसरीने वापर याला प्राधान्य द्यावे लागेल. बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनीही पिकाच्या पद्धती बदल करणे आवश्यक आहे कमी पाण्यात येणारी पिके पीक विविधीकरण आणि स्थानिक हवामान माती. परीक्षण करुन त्या परिस्थितीला अनुरूप शेती करणे यासाठी शेतकऱ्यांना प्रभावी मार्गदर्शन आणि बाजारपेठेची हमी मिळाली पाहिजे. दुष्काळ हा केवळ निसर्गाचा प्रकोप नाही तो सुस्तावलेल्या प्रशासनाच्या तयारीची ही सत्त्वपरीक्षा असते. पाऊस कमी पडणे व दुष्काळ सदृश परिस्थिती निर्माण होणे हे आपल्या व कोणाच्याच हातात नसले तरी त्याचे परिणाम किती तीव्र होतात हे मोठ्या प्रमाणात नियोजनावर अवलंबून आहे. गावातील माणसाला गावातच रोजगार. पाणी आणि सुरक्षितता मिळाली तर तो रोजगारासाठी शहराकडे नक्कीच धाव घेणार नाही. यंदाच्या दुष्काळ सदृश परिस्थितीकडे केवळ मदतीची मागणी म्हणून नव्हे तर ग्रामीण महाराष्ट्रातील शेतकऱ्याच्या भवितव्याचा गंभीर प्रश्न म्हणून पाहाण्याची नितांत गरज आहे दुष्काळ येण्याची वाट पाहण्यापेक्षा शासनाने आपली यंत्रणा गावोगावी पोहोचवली पाहिजे. ग्रामीण भागात तहानलेल्या जमिनीला पाणी आणि बेरोजगार हाताला काम मिळाले तरच स्थलांतर टाळले जाऊ शकते. त्यामुळे ग्रामीण माणसाला आपल्याच गावात सन्मानाने जगण्याचा अधिकार निश्चितपणे प्राप्त होईल असा आशावाद बाळगू.



मोकाटे टॉवर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ कोथरूडच्या बाप्पाची मिरवणूक घोडागाडीतून काढण्यात आली.

# पथनाट्याद्वारे सासवडमध्ये आरोग्य जनजागृती

■ सासवड (दै. संध्या)

जागतिक फार्मासिस्ट दिन २०२६ निमित्त "निरोगी भविष्यासाठी फार्मासिस्टचे सक्षमीकरण" (Empowering Pharmacists for a Healthier Future) या संकल्पनेवर आधारित पथनाट्य स्पर्धा व जनजागृती अभियानाचे आयोजन पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शेठ गोविंद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसी अँड पॉलीटेक्निक, सासवड यांच्या वतीने करण्यात आले.



फार्मासिस्टची सामाजिक बांधिलकी, आरोग्यविषयक जनजागृती तसेच समाजाच्या आरोग्य संवर्धनातील फार्मासिस्टची महत्त्वपूर्ण भूमिका याबाबत विद्यार्थ्यांमध्ये आणि नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. पथनाट्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या परिसरासह सासवड शहरातील जिल्हा व सत्र न्यायालय परिसर (कचेरी), पीएमटी बस स्थानक, सासवड नगरपरिषद, भाजी मार्केट तसेच शहरातील विविध प्रमुख सार्वजनिक ठिकाणी प्रभावी सादरीकरण करून नागरिकांचे प्रबोधन केले. विद्यार्थ्यांनी औषधांचा योग्य व सुरक्षित वापर, स्व-औषधोपचार टाळण्याचे महत्त्व, लसीकरणाचे महत्त्व, औषधांचा दुरुपयोग, प्रतिजैविक प्रतिकारशक्ती (Antimicrobial Resistance), औषधोपचारातील फार्मासिस्टची भूमिका आणि निरोगी जीवनशैली यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर पथनाट्याद्वारे जनजागृती केली. मनोरंजनासोबतच सामाजिक व आरोग्यविषयक संदेश देणाऱ्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. "फार्मासिस्ट हा समाजाच्या आरोग्याचा विश्वासू भागीदार आहे" हा संदेश विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी फार्मसी शिक्षणासोबतच सामाजिक बांधिलकी जपत आरोग्य जनजागृतीमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला.

पथनाट्य स्पर्धेसाठी डॉ. जयश्री जगताप व सौ. सृष्टी जाधव यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. श्री. सागर भिसे, सौ. पायल पाटसकर व कु. पद्मजा मस्के यांनी मार्गदर्शक व समन्वयक म्हणून जबाबदारी पार पाडली. या उपक्रमास पदवी अभ्यासक्रमाच्या प्राचार्य डॉ. राजश्री चव्हाण तसेच डिप्लोमा अभ्यासक्रमाच्या प्राचार्य सौ. विशाखा गायकवाड यांचे मार्गदर्शन व प्रमुख उपस्थिती लाभली.

"जागरूक समाज – निरोगी भविष्य; फार्मासिस्ट नेहमी तुमच्या सोबत!" या संदेशातून विद्यार्थ्यांनी समाजाच्या आरोग्यपूर्ण भविष्यासाठी फार्मासिस्टची भूमिका अधोरेखित केली.

## शारदाबाई पवार विद्यानिकेतन स्कूलचा दिमाखदार विजय



■ बारामती (दै. संध्या)

SNBP International School चिखली,पुणे येथे दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी पार पडलेल्या जिल्हास्तरीय नेहरू हॉकी स्पर्धेत शारदाबाई पवार विद्यानिकेतन स्कूल,बारामती येथील १७ वर्षांखालील मुलांच्या हॉकी संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय कामगिरीमुळे संघाची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. स्पर्धेत संघातील खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक खेळ,शिस्तबद्ध नियोजन तसेच प्रभावी आक्रमण आणि बचावाचे प्रदर्शन करत दमदार कामगिरी केली. या यशाबद्दल संस्थेचे मा.चेअरमन श्री.राजेंद्र पवार दादा व विश्वस्त मा.सौ.सुनंदाताई पवार यांचे मार्गदर्शन लाभले.तसेच प्राचार्य, विभागप्रमुख,क्रीडा शिक्षक व प्रशिक्षक यांचे सहकार्य लाभले.या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरातून खेळाडू व प्रशिक्षकांचे अभिनंदन होत आहे.

## स्केटिंग स्पर्धेत श्रेया व वेदिका पुणे जिल्ह्यात प्रथम

■ बारामती (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद,पुणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शालेय जिल्हास्तरीय स्केटिंग स्पर्धेत ज्ञानसागर गुरुकुल, सावळच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशाची परंपरा कायम राखली आहे. या शासकीय जिल्हास्तरीय स्केटिंग स्पर्धेत ज्ञानसागर गुरुकुलच्या श्रेया रणजीत गोरे आणि वेदिका विजय बारे या दोन्ही विद्यार्थिनींनी आपल्या उत्कृष्ट स्केटिंग कौशल्याचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला.त्यांच्या या दमदार कामगिरीमुळे दोन्ही विद्यार्थिनींची विभागस्तरीय स्केटिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.स्पर्धेदरम्यान दोन्ही खेळाडूंनी वेग,संतुलन,चपळता,तंत्रशुद्ध स्केटिंग तसेच आत्मविश्वासपूर्ण खेळाचे उत्कृष्ट



कु. श्रेया गोरे



कु. वेदिका बारे

प्रदर्शन केले.कठोर सराव,प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावर त्यांनी जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रतिस्पर्ध्यांवर मात करत विजेतेपद मिळविले.ज्ञानसागर गुरुकुलमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच क्रीडा,शिस्त, शारीरिक तंदुरुस्ती आणि व्यक्तिमत्त्व विकासाला विशेष महत्त्व दिले जाते.शाळेतील विविध क्रीडा प्रकारांसाठी विद्यार्थ्यांना नियमित सराव,तज्ज्ञ प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि स्पर्धात्मक वातावरण उपलब्ध करून दिले जाते. याच क्रीडाभिमुख वातावरणातून श्रेया गोरे व वेदिका बारे यांनी मिळविलेले हे यश शाळेतील इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी ठरले आहे असे मत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.सागर मानसिंग आटोळे सर यांनी व्यक्त केले.दोन्ही विद्यार्थिनींच्या या उल्लेखनीय यशाबद्दल ज्ञानसागर गुरुकुलचे संस्थापक-अध्यक्ष डॉ.सागर आटोळे सर, मुख्याध्यापक,क्रीडा विभाग, प्रशिक्षक,शिक्षकवृंद तसेच पालकांनी त्यांचे अभिनंदन केले असून,आगामी विभागस्तरीय स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.जिल्हास्तरीय स्पर्धेतील या यशामुळे ज्ञानसागर गुरुकुलच्या क्रीडा क्षेत्रातील लौकिकात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून,विभागस्तरीय स्पर्धेतही दोन्ही खेळाडू उत्कृष्ट कामगिरी करतील,असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## नीरा भीमा कारखान्यास तांत्रिक कार्यक्षमतेचा पुरस्कार

■ इंदापूर (दै. संध्या)

शहाजीनगर (ता. इंदापूर येथील नीरा भीमा सहकारी साखर कारखान्यास राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्ली यांचा गाळप हंगाम सन 2025-26 साठीचा राष्ट्रीय पातळीवरील तांत्रिक कार्यक्षमतेचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार नवी दिल्ली येथे आयोजित समारंभामध्ये मंगळवारी (दि. 22) प्रदान करण्यात आला. कारखान्याचे संस्थापक हर्षवर्धन पाटील यांच्या समवेत हा पुरस्कार अध्यक्षा सौ.भाग्यश्री पाटील, उपाध्यक्ष दादासाहेब घोगरे व संचालक मंडळांनी स्वीकारला.



राष्ट्रीय कार्यक्षमता पुरस्कार सोहळा 2024-25 व 2025-26 चे प्रास्ताविक राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी केले. त्यानंतर पुरस्कार वितरण समारंभामध्ये केंद्रीय दळणवळण मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय सहकार राज्यमंत्री कृष्ण पाल गुर्जर यांच्या हस्ते निरा भीमा कारखान्यास पुरस्कार प्रदान करण्यात आला. कारखान्याने गळीत हंगाम सन 2025-26 मध्ये उत्कृष्ट तांत्रिक कामगिरी केल्याने राष्ट्रीय कार्यक्षमतेचा पुरस्कार देऊन हा गौरव करण्यात आला. कारखान्यास सन 2025-26 च्या रौप्यमहोत्सवी गळीत हंगामामध्येच देशपातळीवरील सर्वोत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमतेचा प्रथम पुरस्कार मिळाल्याने कारखान्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे, असे गौरोद्गार अध्यक्षा सौ. भाग्यश्री पाटील यांनी काढले. या प्रथम क्रमाकाच्या पुरस्काराबद्दल हर्षवर्धन पाटील व सौ.भाग्यश्री पाटील यांनी संचालक मंडळ, ऊस उत्पादक शेतकरी, ऊस तोडणी वाहतूकदार, अधिकारी, कर्मचारी व हितचिंतकांचे अभिनंदन केले आहे.

## शादीखाना सभागृहाचे भूमिपूजन



■ चोपडज (दै. संध्या)

स्वर्गीय लोकनेते अजितदादा पवार यांच्या संकल्पनेतून चोपडज येथील मुस्लिम समाज सभागृहाच्या कामाचा आराखडा मंजूर झाला असून या कामासाठी लागणारा निधी उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी पवार यांच्या माध्यमातून उर्वरित कामासाठी पुढाकार घेतल्याने आज सदर कामाचे भूमिपूजन करण्यात आले.या कार्यक्रमास पंचायत समिती बारामतीचे सभापती किरण तावरे,जिल्हा परिषद सदस्य रोहिणी कदम ढोले,पंचायत समिती सदस्य जितेंद्र पवार,खरेदी-विक्री संघाचे चेअरमन रमेश देवकाते,चोपडज मुस्लिम जमात अध्यक्ष अझरुद्दीन तांबोळी,अल्पसंख्यांक नेते फिरोज भाई बागवान,मुन्नाभाई बागवान,राजू भाई पठाण,समीर गाडेकर,सोसायटी चेअरमन बाबासो पवार, सुधीर गाडेकर,इमरान खान,लालाभाई मुलानी,इब्राहिम मुलानी,सलीम शेख,अमर शेख,बबलू भाई शेख यांसह मुस्लिम समाजातील सर्व समाज बांधव उपस्थित होते.यामुळे या परिसरातील मुस्लिम बांधवांनी समाधान व्यक्त केले.

# जास्त काळ एकच संचालक, चेअरमन यांना हटवा

## घराणेशाही पद्धत बंद करुन त्यांच्यावर ईडी, सीबीआय चौकशी बसविण्याची मागणी

**शेतकरी कृती समितीच्या मेळाव्यातून शेतकरी नेते सतिश भैय्या काकडे यांची आक्रमक प्रतिक्रिया**

■ सोमेश्वरनगर (दै. संध्या)

शेतकरी,कष्टकऱ्यांच्या हितासाठी व आर्थिक विकासासाठी श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्यात ३५,४० वर्षे एकच संचालक व एकच चेअरमन ही घराणेशाही पद्धत बंद करावी व नवीन चेहऱ्यांना काम करण्यास संधी द्यावी अशी आक्रमक भूमिका शेतकरी कृती समिती,स्वाभिमानी शेतकरी संघटना,शेतकरी नेते सतिश भैय्या काकडे यांनी शेतकरी मेळाव्यातून व्यक्त केली. सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी कृती समितीच्या वतीने आयोजित मेळाव्यात नेते सतीश काकडे यांनी कारखान्याच्या कारभारावर जोरदार टीका केली. कारखान्याच्या नेतृत्वात बदल होण्याची गरज व्यक्त करत,अध्यक्षांना




हटवून कारखान्याच्या कारभाराची चौकशी करण्यात यावी,अशी मागणी काकडे यांनी केली.तसेच कारखान्याच्या आर्थिक व प्रशासकीय कारभाराबाबत स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी करताना काकडे यांनी सीबीआय,एसआयटी किंवा ईडीसारख्या तपास यंत्रणांमार्फत चौकशी करण्याचीही मागणी केली.या यंत्रणांमार्फत चौकशी करण्याचा अंतिम निर्णय संबंधित सक्षम यंत्रणांनी घ्यावा,असेही त्यांनी स्पष्ट केले.

कारखान्याच्या कारभारासंदर्भात आपल्याकडे काही माहिती आणि पुरावे असल्याचा दावा करत,योग्य वेळी हे पुरावे समोर आणले जातील,असेही काकडे यांनी सांगितले.

दरम्यान,निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी मेळाव्यात शेतकरी कृती समितीची भूमिका स्पष्ट करताना काकडे यांनी सुनेत्रा अजितदादा पवार यांच्या पाठीशी शेतकरी कृती समिती ठामपणे उभी राहणार असल्याचे सांगितले. मात्र,केवळ निवडणुकीपुरता पाठिंबा न देता कारखान्याच्या हितासाठी काही महत्त्वाच्या मुद्द्यांवर ठोस निर्णय होणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.कारखान्याचा कारभार पारदर्शक असावा,सभासदांच्या प्रश्नांना न्याय मिळावा आणि नव्या नेतृत्वाला संधी मिळावी,अशी समितीची भूमिका असल्याचे काकडे यांनी सांगितले.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



### सक्षम भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी भारताने पुन्हा एकदा सागरी महासत्ता बनले पाहिजे

**पुणे : दैनिक संध्या**

पुणे : "भारताला समृद्ध, सक्षम आणि आत्मनिर्भर राष्ट्र बनविण्याचे स्वप्न साकार करायचे असेल, तर भारताने पुन्हा एकदा जागतिक स्तरावर एक प्रभावी सागरी महासत्ता म्हणून स्वतःची ओळख निर्माण करणे आवश्यक आहे. भारताला हजारो वर्षांची समृद्ध सागरी परंपरा लाभली आहे. लोथलसारखी प्राचीन बंदरे तसेच आग्नेय आशियातील देशांशी भारताचे प्राचीन काळापासून असलेले व्यापारी आणि सांस्कृतिक संबंध या गौरवशाली सागरी वारशाची साक्ष देतात. या वैभवशाली इतिहासाचा पुन्हा शोध घेऊन त्यातून प्रेरणा घेत भारताच्या सागरी सामर्थ्याला नवी दिशा देण्याची गरज आहे," असे प्रतिपादन डायनॅमिक लॉजिस्टिक्सचे व्यवस्थापकीय संचालक श्री. प्रफुल्ल तलेरा यांनी केले. ते सी स्काऊट्स अँड गाईड्स, इंडिया यांच्या सिल्व्हर ज्युबिली वर्षानिमित्त सेंट अँड्र्यूज, चिंचवड युनिटच्या प्रशिक्षण केंद्रात आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमात बोलत होते. यावेळी त्यांनी स्काऊट कॅडेट्सना " सत्तेची निर्णायक केंद्रे आणि जगावर नियंत्रण ठेवणाऱ्या मुख्य चाव्या" (The Chokepoints of Power and the Master Keys That Control the World) या विषयावर मार्गदर्शन केले. जागतिक व्यापार, पुरवठा साखळी, लॉजिस्टिक्स आणि सागरी व्यापार यांचा एकमेकांशी असलेला घनिष्ठ संबंध स्पष्ट करताना श्री. तलेरा यांनी कॅडेट्सना जगातील प्रमुख सागरी मार्ग, महत्त्वाची भौगोलिक ठिकाणे तसेच आंतरराष्ट्रीय व्यापारावर प्रभाव टाकणाऱ्या महत्त्वपूर्ण सागरी व्यापार मार्गांवरील 'चोकपॉइंट्स' याबाबत माहिती दिली. तसेच लॉजिस्टिक्स क्षेत्रातील वाढत्या संधी आणि सागरी क्षेत्रातील विविध करिअरच्या संधींबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सी स्काऊट्स अँड गाईड्स, इंडियाचे संस्थापक व कॅप्टन सुपरिटेंडंट कॅप्टन डॉ. गोपी शेट्टी यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नेतृत्वगुण, साहस आणि राष्ट्रसेवेची भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने २५ वर्षांपूर्वी सी स्काऊट्स अँड गाईड्सची स्थापना करण्यात आली. ते पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांना भारतीय नौदल, सशस्त्र दल आणि मर्चंट नेव्ही यांसारख्या क्षेत्रांमध्ये करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन करण्याबरोबरच संस्थेमार्फत कॅडेट्सना सागरी उपक्रम, शारीरिक प्रशिक्षण, नेतृत्व विकास तसेच विविध क्षेत्रातील तज्ज्ञ आणि व्यावसायिकांशी संवाद साधण्याच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात. अशा उपक्रमांमुळे युवा कॅडेट्समध्ये भारताच्या गौरवशाली सागरी वारशाबद्दल जागरूकता निर्माण होण्यासोबतच समुद्राचे सामरिक, आर्थिक आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने असलेले महत्त्व समजण्यास मदत होते, असेही डॉ. शेट्टी यांनी सांगितले. या कार्यक्रमाच्या वेळी कमोडोर देशमुख, कमांडर बेहेरा सी स्काऊट्स अँड गाईड्स, इंडियाचे संस्थापक व कॅप्टन सुपरिटेंडंट कॅप्टन डॉ. गोपी शेट्टी, गौरी शेट्टी आणि श्री. पांढरे यांच्यासह सुमारे ४०० स्काऊट कॅडेट्स आणि त्यांचे पालक उपस्थित होते. सी स्काऊट्स अँड गाईड्स, इंडियाच्या रौप्य महोत्सवी वर्षातील हा कार्यक्रम युवा विकास, सागरी जागरूकता, नेतृत्वगुण आणि राष्ट्रसेवेच्या भावनेला प्रोत्साहन देण्याच्या संस्थेच्या वचनबद्धतेचे प्रतीक ठरला.

### ऑलिम्पिक सुवर्णविजेत्यांना ५ कोटींचे बक्षीस

**पुणे : दैनिक संध्या**

राज्यातील क्रीडा संस्कृतीला अधिक प्रोत्साहन देण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर देशाचे व राज्याचे नाव उज्ज्वल करणाऱ्या गुणवान खेळाडूंसाठी महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता खेळाडूंना कोटींच्या घरात बक्षिसे मिळणार आहेत. क्रीडा धोरण २०१२ अंतर्गत आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पदक विजेता खेळाडू तसेच त्यांच्या क्रीडा मार्गदर्शकांना (कोचेस) दिल्या जाणाऱ्या रोख बक्षिसांच्या रक्कमेत भरघोस वाढ केली आहे. शासनाच्या या नव्या निर्णयामुळे राज्यातील खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. नवीन सुधारित धोरणानुसार ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक पटकावणाऱ्या खेळाडूस आता थेट पाच कोटी रुपयांचे विक्रमी रोख पारितोषिक दिले जाणार आहे. तसेच, याच स्पर्धेत रौप्य पदक विजेत्याला तीन कोटी रुपये आणि कांस्य पदक विजेत्या खेळाडूला दोन कोटी रुपयांचे घसघशीत बक्षीस मिळणार आहे. याशिवाय आशियाई व राष्ट्रकुल खेळांमधील सुवर्णपदकासाठी एक कोटी रुपयांचे पारितोषिक निश्चित केले आहे.

### गणेशोत्सवाच्या गर्दीत घुमतोय 'ऐका हो ऐका...';

**पुणे : दैनिक संध्या**

गणेशोत्सवात गणरायाचे दर्शन आणि देखावे पाहण्यासाठी पुणेकरांची गर्दी होत असतानाच या गर्दीत 'ऐका हो ऐका...'चा आवाज घुमतो आणि काही क्षणांत नागरिकांचे लक्ष कलाकारांच्या पथनाट्याकडे वेधले जाते. सध्या उत्सवात ठिकठिकाणी विविध कला पथक आणि संस्थांमधील कलाकार पथनाट्य सादर करीत असून, पथनाट्यांतून एचआयव्ही एड्स जनजागृती, वाहतूक नियम, नागरिक शिष्टाचार, स्वच्छता, महिला सुरक्षितता, अशा विविध सामाजिक प्रश्नांवर प्रबोधन केले जात आहे. गणेशोत्सवातील उत्सवी वातावरणाला समाजप्रबोधनाची जोड देत शहराच्या मध्यवर्ती भागांपासून उपनगरांपर्यंत विविध संस्था आणि कलापथकांनी पथनाट्यांचा जागर सुरू केला आहे. कलाकारांच्या प्रभावी अभिनयातून मांडले जाणारे विषय नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत. सायंकाळच्या गर्दीत सादर होणाऱ्या या पथनाट्यांना पुणेकरांकडूनही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. गणेशोत्सवात मंडळांकडून जिवंत देखावे सादर केले जात आहेतच. त्याच धर्तीवर काही संस्था आणि कला पथकांकडून सामाजिक संदेश देणारी पथनाट्ये सादर केली जात आहेत. उत्सवाच्या पहिल्या दिवसापासून शहरातील विविध भागांत कलाकार गर्दीत मिसळून पथनाट्य सादर करीत आहेत. सायंकाळी सहानंतर मंडळांचे देखावे पाहण्यासाठी जमलेल्या नागरिकांसमोर हे प्रयोग होत असून, रात्री दहापर्यंत विविध ठिकाणी त्यांचे सादरीकरण सुरू असते. पुणे महापालिकेच्या पुणे शहर एड्स नियंत्रण संस्थेच्या माध्यमातून गणेशोत्सवात एचआयव्ही एड्सविषयी जनजागृती केली जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून जनजागृती कला मंचचे कलाकार गर्दीत पथनाट्य सादर करून नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करीत आहेत. मंचचे नरेंद्र सावंत म्हणाले की, गेल्या अनेक वर्षांपासून मी आणि माझे सहकलाकार गणेशोत्सवात पथनाट्य सादर करीत आहोत. उत्सवात कला सादर करण्याचा आनंद मिळतोच; पण त्याचबरोबर एखाद्या ज्वलंत विषयावर नागरिकांमध्ये जनजागृती करण्याची संधीही मिळते. पथनाट्य हे समाजजागृतीचे प्रभावी माध्यम आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही स्व-रूपवर्धिनीच्या वतीने गणेशोत्सवात पथनाट्यांचे सादरीकरण केले जात आहे.

## नागरिकांची विसर्जनस्थळी गर्दी



घरगुती गणपतीसह अनेक सोसायट्या, व्यावसायिक आस्थापना गणेशमूर्तींच्या विसर्जनासाठी नागरिकांची विविध विसर्जनस्थळी गर्दी पाहण्यात आली. विसर्जनस्थळी नागरिक आपल्या परिवारासह गणपती बाप्पांची आरती करून ....."गणपती बाप्पा मोरया ... मंगलमूर्ती मोरया .... पुढच्या वर्षी लवकर या"च्या जयघोषात लाडक्या गणरायाला भक्तिभावाने दिला निरोप. नदीपात्रासह ओढे नाल्यांच्या परिसरात कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. विविध विसर्जनस्थळी मूर्ती विसर्जनानंतर होणारे निर्माल्य संकलित करताना महापालिका कर्मचारी दिसून आले. ( Exclusive Pictures by Sushil Rathod )

## पुण्याच्या ट्रॅफिकवर जितेंद्र नाराज

■ पुणे (दै. संध्या)

गेल्या १५ वर्षांपासून मी पुण्यात गणपती बाप्पाच्या दर्शनासाठी नियमित येत आहे. मात्र, अलिकडच्या काळात पुण्यातील वाहतूक कोंडी प्रचंड वाढली आहे. यंदा तर मला तब्बल दीड तास ट्रॅफिकमध्ये अडकून राहावे लागले. सुदैवाने मंडळाच्या कार्यकर्त्यांनी वेळेत मदत केली; अन्यथा रात्री ११ वाजेपर्यंत रस्त्यावरच अडकून पडलो असतो, अशा शब्दांत बॉलिवूडचे ज्येष्ठ अभिनेते जितेंद्र यांनी पुण्यातील बिघडलेल्या वाहतूकव्यवस्थेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. पुण्यातील छत्रपती राजाराम मित्रमंडळाच्या गणपती बाप्पाच्या दर्शनासाठी अभिनेते जितेंद्र सोमवारी (दि. २१) सायंकाळी आले होते. या वेळी उपस्थित माध्यम प्रतिनिधींशी बोलताना त्यांनी पुण्यातील वाढत्या ट्रॅफिकचा चांगलाच समाचार घेतला. आपल्या भावना व्यक्त करताना जितेंद्र म्हणाले की, मी आता ८५ वर्षांचा झालो आहे. वाढत्या वयासोबत अडचणी येत असल्या, तरी जोपर्यंत शरीरात प्राण आहे तोपर्यंत या मंडळाच्या बाप्पाच्या दर्शनासाठी मी पुण्यात येतच राहणार आहे.

## एस. एस. नगरकर ज्वेलर्सच्या भव्य दालनाचे उद्घाटन

■ पुणे(दै. संध्या)



मागील ७५ वर्षांपासून पुणेकरांच्या पसंतीस उतरलेल्या एस. एस. नगरकर ज्वेलर्सच्या पाचव्या दालनाचे आज (२० सप्टेंबर) रविवारी बाणेरमध्ये उद्घाटन करण्यात आले. बाणेर-म्हाळुंगे रोडवर असलेल्या या दालनामुळे लगतच्या परीसरातील ग्राहकांना आता नगरकर ज्वेलर्सच्या वैशिष्ट्यपूर्ण दागिन्यांची खरेदी करता येणार आहे. उद्घाटनाप्रसंगी वसंत नगरकर, स्वाती वल्लभ नगरकर, वासंती वसंत नगरकर, प्रसाद नगरकर, पुष्कर नगरकर, प्रियांका नगरकर, अनघा नगरकर, पूजा नगरकर कुलकर्णी, रोहन कुलकर्णी, कुहू नगरकर उपस्थित होते.

कायनेटीक ग्रुपच्या संचालिका जयश्री फिरोदिया, उद्योजक जगदीश कदम व मोहना कदम, एम. बी. पाटील व संगिता पाटील या नगरकर ज्वेलर्सच्या मान्यवर ग्राहकांच्या हस्ते दालनाचे उद्घाटन करण्यात आले. सामाजिकतेचे भान राखत नगरकर ज्वेलर्सकडून तीन सामाजिक संस्थांना प्रत्येकी एक लाखाची अर्थिक मदत करण्यात आली. यामध्ये कर्णबधिर मुलांच्या पुर्नवसनासाठी कार्यरत सुहृद फाऊंडेशन, वंचित घटकांसाठी काम करणारी वंचित विकास व सोलापूर येथील संस्कार संजीवन या संस्थांचा समावेश आहे. सुहृद फाऊंडेशनच्या अनुराधा पाथरफोड व गौरी लेले, वंचित विकासचे विजयकुमार मर्लेचा, देवयानी गोंगले व मिनाक्षी नवले, संस्कार संजीवन फाऊंडेशनचे परमेश्वर काळे व संदिप तिरकुंडे यांनी धनादेश स्वीकारला.

जयश्री फिरोदिया यांनी दालनाच्या भव्यतेचे तसेच दागिन्यांच्या वैशिष्टयपूर्ण घडणावळींचे कौतुक केले. नगरकर परिवाराने परंपरेचा साजाला उत्कृष्टतेची जोड देत आपली वेगळी ओळख निर्माण केल्याचे त्यांनी नमूद केले. जगदीश कदम यांनीही नगरकर ज्वेलर्सचे कौतुक करताना व्यवसायासोबतच सामाजिकतेचे भान जपणारे हे कुटुंब असल्याचा विशेष उल्लेख केला. सात दशकांपूर्वी सुरू झालेल्या या व्यवसायाला वल्लभ आणि वसंत नगरकर यांच्यानंतर नवी पिढी जोमाने पुढे नेत आहे. ग्राहकांच्या समाधानाला प्राधान्य देणाऱ्या नगरकर ज्वेलर्सचा विस्तार देशभर व्हावा, अशी आशा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

वसंत नगरकर म्हणाले, "श्रीपाद नगरकर यांनी १९५२ मध्ये श्रीपाद शंकर नगरकर ज्वेलर्सची मुहूर्तमेढ रोवली. आता नगरकरांची तिसरी पिढी प्रसाद आणि पुष्कर या अँटिक, युनिक दागिन्यांची परंपरा पुण्यासह राज्यातील इतर शहरांत घेऊन जाण्यासाठी मेहनत करत आहेत. हा परंपरागत व्यवसाय असून पारंपरिक आणि शुद्ध दागिने ही आमची खासियत आहे. शहराचा झपाट्याने विस्तार होत असताना ग्राहकांना आपण राहत असलेल्या ठिकाणी खरेदी करणे सोपे व्हावे याद्दष्टीने बाणेरमध्ये शाखा सुरू करत आहोत."

प्रसाद नगरकर म्हणाले, "नगरकर ज्वेलर्सचा येत्या काळात पुण्यासह इतर जिल्ह्यांमध्ये विस्तार करण्याचा आमचे नियोजन आहे. पारंपरिक दागिन्यांसोबतच आर्या कलेक्शनमध्ये विविध प्रकारचे दागिने उपलब्ध होणार आहेत. याशिवाय काही वर्षांपूर्वीच सुरू केलेल्या राजवाडा या विशेष संकल्पनेअंतर्गत एलिट क्लासचे दागिने घडवण्यात येतात, यात एक डिझाईन एकदाच घडवले जाते व ते एक्स्लुझिव्ह असते. हे राजवाडा दालन खरेदीसाठीच नाही तर पाहण्यासाठीही अतिशय आकर्षक अशी रचना असलेले आहे."

पुष्कर नगरकर म्हणाले, "पुण्यातील तुळशीबाग, लक्ष्मी रोड, कोथरुड आणि ठाणे येथील ग्राहकांना दिलेल्या विश्वासार्ह आणि दर्जेदार सेवेनंतर आता बाणेर येथे नवीन दालन सुरू झाले आहे. नाविन्यपूर्ण दागिन्यांची पर्वणी उपलब्ध करून देताना आम्हाला आनंद होत आहे. सोने, चांदी, हिरे यातील पारंपरिक आणि फ्युजन दागिन्यांचे असंख्य प्रकार आपल्याकडे आहेत. कमी वजनापासून ते जास्त वजनापर्यंतचे सर्व दागिने येथे मिळणार आहेत."

या दालनात सोने, चांदी, हिरे, पोल्की यातील नाविन्यपूर्ण दागिने येथे आहेत. पारंपरिक दागिने, बकुळी, पोहे हार, ठुशी, श्रीमंत हार, कोल्हापुरी साज, वज्र टीका, चंद्रहार, मोत्यांचे दागिने, फ्युजन डिझाईनचे कुंदन नेकलेस, गेरू नेकलेस, नकास वर्क, मोती कुंदन, गहू तोड्याचे नेकलेस राणी व लक्ष्मीहार अशा असंख्य दागिन्यांची गुंफण येथे असणार आहे. याशिवाय चांदीचे देवघर, देवदेवतांच्या मुर्ती, सोफासेट असे दुर्मिळ प्रकारही ग्राहकांना उपलब्ध होतील, असेही नगरकर यांनी सांगितले.

## 'जयंती २'ला बॉक्स ऑफिसवर तुफान प्रतिसाद

■ पुणे (दै. संध्या)

कॉलेजमधील भेदभावाची गंभीर गोष्ट सांगणाऱ्या "जयंती २" या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर दमदार कामगिरी केली आहे. दुसऱ्याच आठवड्यात चित्रपटाचे थिएटर्समधील शोज मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. जयंती चित्रपटाला मिळालेल्या यशाच्या पावलावर पाऊल ठेवूनच "जयंती २"ची वाटचाल सुरू आहे.

'जयंती २' हा चित्रपट ११ सप्टेंबर रोजी प्रदर्शित झाला. या चित्रपटाची निर्मिती मेलिओरिस्ट फिल्म स्टुडिओने केली असून चित्रपटाची कथा, संवाद आणि दिग्दर्शन शैलेश बळीराम नरवाडे यांचे आहे. 'जयंती' चित्रपटाचा प्रमुख चेहरा असलेला अभिनेता ऋतुराज



वानखेडे या चित्रपटात मध्यवर्ती भूमिका साकारत असून पायल जाधव, अभिनेत्री प्रियदर्शनी इंदलकर, रोहिणी हट्टंगडी, देविका दफ्तरदार, विजय निकम, राजकुमार जरांगे, मानसी सुभाष अशी दमदार कलाकारांची फौज आपल्याला या चित्रपटातून भेटीस येणार आहे. संजीवकुमार हिल्ली यांनी कॅमेरामन म्हणून काम पाहिले असून संकलन फैसल महाडिक यांचे आहे. डॉ. सुहास अंबादे , सुहास मुंडे आणि सौरभ गुरू यांनी लिहिलेल्या गीतांना ओंकारस्वरूप यांचे संगीत लाभले असून पार्श्वसंगीत मंगेश धाकडे यांचे आहे.

चंद्रपूरसारख्या भागातून उच्च शिक्षणासाठी शहरात येणाऱ्या पायल नावाच्या एका मुलीची गोष्ट 'जयंती २' या चित्रपटात मांडण्यात आली आहे. उच्च शिक्षण घेऊन शेती करण्याचं स्वप्न पायलनं उराशी बाळगलं आहे. मात्र, कॉलेजमध्ये आल्यावर तिला रॅगिंगला सामोरं जावं लागतं. या त्रासाला केलेल्या विरोधातून एक संघर्ष उभा राहतो. त्यात पायलचं काय होतं, तिला न्याय मिळतो का, हे चित्रपटात मांडण्यात आलं आहे.



प्रकाश - ध्वनीच्या माध्यमातून ऐतिहासिक शनिवारवाडा येथे उलगडला पुण्याचा इतिहास. पुणे शहराचा समृद्ध ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा आधुनिक तंत्रज्ञानाचा माध्यमातून नव्या पिढी समोर प्रभावीपणे मढण्यात आले. पुणे महानगरपालिका आणि पुणे प्रथम च्या वतीने "पुनवडी ते पुणे" लाईट अँड साउंड शो शनिवारवाड्याच्या प्रांगणात करण्यात आले. पुनवडी ते अधूनिक पुणे शहराच्या विकासाचा, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वैभवाचा प्रवास प्रकाश ध्वनी च्या माध्यमातून जिवंत करण्यात आला. " पुनवडी ते पुणे" लाईट अँड साऊंड प्रत्यक्ष अनुभव करण्यासाठी भाविकांची शनिवारवाडा येथे मोठी गर्दी पाहण्यात आली. ( Exclusive Pictures by Sushil Rathod )

## देविका दफ्तरदार यांची भावस्पर्शी भूमिका असलेला 'सहल' ९ ऑक्टोबरला

■ पुणे (दै. संध्या)

मराठी चित्रपटसृष्टीतील गुणी अभिनेत्री देविका दफ्तरदार महत्त्वपूर्ण भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. 'सहल' या आगामी मराठी चित्रपटात त्यांची भावस्पर्शी भूमिका पहायला मिळणार आहे. ९ ऑक्टोबरला 'सहल' चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचं पोस्टर लाँच करण्यात आलं आहे.

के. स्वामिनी फिल्म प्रॉडक्शनच्या बॅनरखाली निर्मित या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन मुकुंद वसंत खुपेरकर यांनी केले आहे. चित्रपटाचे निर्माते प्रशांत केसरकर आणि विलास केसरकर असून, सहनिर्माते मुकुंद वसंत खुपेरकर आहेत. मूळ पटकथा मुकुंद वसंत खुपेरकर यांनी लिहिली आहे. 'सहल'मध्ये देविका दफ्तरदार यांच्यासोबत सिद्धेश मुकुंद खुपेरकर, कल्याणी अडसुळ, आदित्य खुपेरकर आणि सागर कोळी यांच्या प्रमुख भूमिका आहेत.सिद्धेश मुकुंद खुपेरकर याचे या चित्रपटाच्या माध्यमातून मुख्य नायक म्हणून पदार्पण असून त्याने याआधी झी मराठीवरील प्रसिद्ध मालिका "तुझ्यात जीव रंगला" यामध्ये लहान राणाच्या भावाची म्हणजेच सुरजची भुमिका साकारली होती, तसेच डॉ केशव हेगडेवार ह्यांची बाल भुमिका ही साकारली होती.चित्रपटाचे छायांकन अभिषेक शेटे यानी केले असून, संकलनाची जबाबदारी चंद्रशेखर गुरव यांनी सांभाळली आहे. सुहास मुंढे, समीर पठाण यांनी लिहिलेल्या गीतांना डॉ. जय भीम शिंदे यांचे संगीत दिग्दर्शन लाभले असून सुप्रसिद्ध गायक आदर्श शिंदे याच्या आवाजात चित्रपटातील गीत स्वरबद्ध करण्यात आले आहे. मुकुंद वसंत खुपेरकर यांनी कार्यकारी निर्माता, श्रेय चव्हाण यांनी वेशभूषा, आदित्य चव्हाण यांनी ध्वनिसंयोजन तर प्रशांत कुंभार यांनी कला दिग्दर्शन केले आहे. देविका दफ्तरदार यांनी अनेक चित्रपटांतून अत्यंत संवेदनशील भूमिका साकारून त्यांच्यातील सक्षम अभिनेत्रीचं दर्शन घडवलं आहे.



# भटक्या-विमुक्त पात्र कुटुंबांना शिधापत्रिका व अन्नधान्याचा लाभ मिळण्यासाठी सकारात्मक भूमिका

## ॲड. मंगेश ससाणे व भैरव क्रांती सेनेचे अध्यक्ष विजय जाधव यांनी मांडल्या समाजबांधवांच्या समस्या; विभागीय उपायुक्त दिनेश तावरे यांचा सकारात्मक प्रतिसाद

■ पुणे (दै. संध्या)

भटक्या-विमुक्त जाती-जमातीतील शिधापत्रिकेपासून वंचित असलेल्या पात्र कुटुंबांना शिधापत्रिका तसेच शासकीय अन्नधान्य योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी पुणे विभागीय आयुक्त कार्यालयातील विभागीय उपायुक्त (पुरवठा) मा. दिनेश तावरे यांच्या समवेत आज महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.



या बैठकीत भटक्या-विमुक्त व ओबीसी समाजाचे नेते ॲड. मंगेश ससाणे तसेच भैरव क्रांती सेनेचे अध्यक्ष विजय जाधव यांनी समाजातील पात्र कुटुंबांना भेडसावणाऱ्या शिधापत्रिका व अन्नधान्याच्या प्रश्नांबाबत सविस्तर माहिती प्रशासनासमोर मांडली.

'फिरती शिधापत्रिका'च्या तरतुदीच्या प्रभावी अंमलबजावणीची मागणी : भटक्या-विमुक्त समाजातील अनेक कुटुंबे पारंपरिक व स्थलांतरित जीवनपद्धतीमुळे एका ठिकाणी कायमस्वरूपी वास्तव्यास नसतात. त्यामुळे आवश्यक कागदपत्रे, स्थायी पत्ता आणि शिधापत्रिका यासंदर्भात त्यांना विविध प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर ॲड. मंगेश ससाणे यांनी 'फिरती शिधापत्रिका' या तरतुदीसह संबंधित प्रशासकीय बाबींची प्रभावी अंमलबजावणी करण्याची गरज स्पष्ट केली. पात्र कुटुंबांना केवळ कागदपत्रांच्या अडचणींमुळे अन्नधान्याच्या शासकीय लाभापासून वंचित राहावे लागू नये, अशी भूमिका त्यांनी मांडली.

भैरव क्रांती सेनेचे अध्यक्ष विजय जाधव यांनी भटक्या-विमुक्त समाजाची सद्यस्थिती, त्यांची पारंपरिक जीवनपद्धती, स्थलांतरित स्वरूपाचे वास्तव तसेच शिधापत्रिका नसल्यामुळे कुटुंबांना येणाऱ्या अडचणी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्या. पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या अन्नधान्य योजनांचा लाभ मिळण्यासाठी स्थानिक पातळीवर आवश्यक मार्गदर्शन व प्रशासकीय सहकार्य उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली.

बैठकीत मांडण्यात आलेल्या सर्व समस्या विभागीय उपायुक्त (पुरवठा) मा. दिनेश तावरे यांनी गांभीर्याने व संवेदनशीलतेने ऐकून घेतल्या. पात्र लाभार्थ्यांना शिधापत्रिका व अन्नधान्याचा लाभ मिळण्यासाठी पुरवठा विभागामार्फत आवश्यक सहकार्य व कार्यवाही करण्यात येईल, अशी सकारात्मक भूमिका त्यांनी व्यक्त केली. समाजाच्या प्रत्यक्ष अडचणी समजून घेऊन त्यावर प्रशासकीय पातळीवर सकारात्मक विचार करण्याची भूमिका घेतल्याबद्दल उपस्थितांनी मा. दिनेश तावरे यांच्या संवेदनशील व सहकार्यशील भूमिकेचे कौतुक केले. बैठकीचा प्रमुख निष्कर्ष असा राहिला की, भटक्या-विमुक्त समाजातील पात्र कुटुंबांना शिधापत्रिका व शासकीय अन्नधान्याचा लाभ मिळण्यासाठी पुरवठा विभागामार्फत आवश्यक सहकार्य व कार्यवाही करण्यात येईल. तसेच पात्र लाभार्थ्यांच्या अडचणींचा विचार करून त्यांना शासकीय योजनांच्या लाभाच्या प्रवाहात आणण्यासाठी आवश्यक प्रशासकीय प्रयत्न केले जातील.

यामुळे शिधापत्रिकेपासून वंचित असलेल्या भटक्या-विमुक्त समाजातील पात्र कुटुंबांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. या बैठकीस भैरव क्रांती सेनेचे प्रदेश कार्याध्यक्ष शंकर जाधव तसेच प्रदेश उपाध्यक्ष गोविंदराव अटक उपस्थित होते. भटक्या-विमुक्त समाजाच्या मूलभूत प्रश्नावर प्रशासनाने घेतलेली सकारात्मक भूमिका ही केवळ एका शिधापत्रिकेचा प्रश्न नसून, पात्र कुटुंबांना त्यांच्या हक्काच्या शासकीय योजनांशी जोडण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल आहे. प्रशासनाने दिलेल्या सकारात्मक प्रतिसादाबद्दल समाजबांधवांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे




### 'एमआयटी एडीटी'च्या इंग्रजी शिक्षण मॉडेलची 'केंब्रिज'कडून दखल

पुणे : दैनिक संध्या

इंग्रजी भाषेतील प्रावीण्य वाढविण्यासाठी गेल्या चार वर्षांत १० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन केंब्रिज लिंग्वास्किल प्रमाणपत्र मिळवून देण्याचा उपक्रम राबविल्याबद्दल एमआयटी आर्ट, डिझाइन अँड टेक्नॉलॉजी (एमआयटी एडीटी) विद्यापीठाच्या कार्याचा चार वर्षांचा प्रभाव-अभ्यास केंब्रिज विद्यापीठ, यूकेने प्रकाशित केला आहे. या अभ्यासाचे प्रकाशन तसेच लिंग्वास्किल प्रमाणपत्र वितरण समारंभ मंगळवारी विद्यापीठाच्या प्रयाग सभागृहात पार पडला. केंब्रिज विद्यापीठाचे उत्पादन व्यवस्थापक इयान कॉवली कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., प्रोव्होस्ट प्रा. डॉ. सायली गणारकर, केंब्रिज विद्यापीठाच्या दक्षिण आशिया विभागाच्या प्रमुख डॉ. संगीता मेहता, केंब्रिज परीक्षा केंद्राचे व्यवस्थापक डॉ. अतुल पाटील, विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक डॉ. ज्ञानदेव निलवर्ण हेही व्यासपीठावर उपस्थित होते. एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या अधिकृत केंब्रिज केंद्राच्या माध्यमातून प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी भाषेचे प्रशिक्षण आणि मूल्यांकन अनिवार्य करण्यात आले आहे. त्यानुसार, 'केंब्रिज इंग्लिश मूल्यमापनाद्वारे रोजगारक्षम संवादकौशल्यांची बळकटी' या शीर्षकाखाली विद्यार्थ्यांच्या संवादकौशल्याचा आणि रोजगारक्षमतेचा विकास करण्यासाठी विद्यापीठाने राबविलेल्या इंग्रजी भाषा उपक्रमाचा अभ्यास व मूल्यांकन केंब्रिजतर्फे करण्यात आले. एमआयटी एडीटी केंब्रिज केंद्राद्वारे मागील चार शैक्षणिक वर्षांत १० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेच्या प्रावीण्याचे प्रशिक्षण घेत प्रमाणपत्र मिळविले आहे. मागील शैक्षणिक वर्षात लिंग्वास्किल परीक्षेला बसलेल्या ३,४६१ विद्यार्थ्यांपैकी ३७८ विद्यार्थ्यांनी सी१ आणि सी२ ही उच्च प्रावीण्याची पातळी प्राप्त केली आहे. या विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील संवादकौशल्याचे मानदंड गाठल्याचे विद्यापीठाच्या वतीने सांगण्यात आले.

### एअरटेलने पोस्टपेड ऑफरिंगमध्ये वाढ केली; ॲपल टीव्ही आणि ॲपल आर्केडचा समावेश




नवी दिल्ली : दैनिक संध्या

भारतातील आघाडीच्या टेलिकम्युनिकेशन सर्व्हिस प्रोव्हायडर्सपैकी एक असलेल्या भारती एअरटेलने आपल्या ₹९९९ आणि त्याहून अधिक किमतीच्या फॅमिली पोस्टपेड प्लॅन्समध्ये ॲपलच्या आयक्लाउड+ चा समावेश करून त्यात आणखी सुधारणा केल्याची घोषणा केली आहे. नव्याने विस्तारित आयक्लाउड+ मध्ये आता ॲपल टीव्ही आणि ॲपल आर्केडचाही समावेश आहे. यामुळे कस्टमर्सना अधिक व्हॅल्यू मिळणार असून, त्यांचे पोस्टपेड प्लॅन अपग्रेड करण्यासाठी आणखी एक कारण मिळणार आहे. एअरटेलच्या या नव्या पोस्टपेड ऑफरिंगमध्ये ॲपलच्या नव्याने विस्तारित आयक्लाउड+ ऑफरिंग्जचा समावेश आहे. यामध्ये पर्सनल कंटेंट सुरक्षितपणे स्टोअर करणे आणि शेअर करणे, तसेच ॲपल टीव्हीवरील पुरस्कारप्राप्त ओरिजिनल्सचा ॲक्सेस आणि ॲपल आर्केडवरील शेकडो अत्यंत मनोरंजक गेम्सचा आनंद घेण्याची सुविधा मिळते. ही नवी ऑफर ₹९९९ आणि त्याहून अधिक किमतीचे फॅमिली प्लॅन्स वापरणाऱ्या एअरटेल कस्टमर्ससाठी उपलब्ध आहे. आयक्लाउड+ मुळे एअरटेलचे लाखो पोस्टपेड कस्टमर्स त्यांच्या ॲपल डिव्हाइसेसवर फोटो, फाइल्स, पासवर्ड्स, कॉन्टॅक्ट्स आणि इतर महत्त्वाची माहिती स्टोअर, सिंक आणि ॲक्सेस करू शकतील. त्यांचा डेटा सुरक्षितपणे बॅकअपही केला जाईल. त्यामुळे नवीन डिव्हाइस सेट अप करणे अधिक सोपे होईल आणि त्यांचे डिजिटल जीवन कनेक्टेड आणि सहज ॲक्सेस करता येण्याजोगे राहील. ॲपल टीव्हीच्या माध्यमातून ॲपलच्या प्रीमियम ओरिजिनल सीरिज आणि मुव्हीजचा ॲक्सेस मिळतो, तर ॲपल आर्केडवर जाहिराती किंवा इन-ॲप पर्चेसेसशिवाय गेम्सच्या कॅटलॉगचा अनलिमिटेड ॲक्सेस मिळतो. ₹९९९ फॅमिली पोस्टपेड प्लॅनमध्ये तीन जणांच्या कुटुंबासाठी फास्टलेन टेक्नॉलॉजीसह अनलिमिटेड डेटा, स्पॅम प्रोटेक्शन आणि विविध एंटरटेनमेंट सब्स्क्रिप्शन्सचा ॲक्सेस मिळतो.

## पुण्यात लोटस कार्स इंडियाचा एक्सक्लुझिव्ह अनुभव घेण्याची संधी

■ पुणे (दै. संध्या)

'लोटस कार्स इंडिया'ने देशभरात ग्राहक आणि संभाव्य ग्राहकांसाठी एका विशेष 'ब्रँड अनुभव' उपक्रमाची घोषणा केली आहे. या उपक्रमाद्वारे त्यांची पुरस्कारविजेती इलेक्ट्रिक परफॉर्मन्स कार 'लोटस इलेट्रे' भारतातील प्रमुख लक्झरी वाहन बाजारपेठांमधील ग्राहकांपर्यंत पोहोचवली जाणार असून, या दौऱ्याच्या पश्चिम भारतातील टप्प्यामध्ये पुणे हे एक महत्त्वाचे ठिकाण असणार आहे.



विविध शहरांच्या या दौऱ्याचा एक भाग म्हणून लोटस कार्स इंडिया संभाव्य ग्राहक, उद्योजक, व्यावसायिक नेते, आलिशान जीवनशैलीचे ग्राहक आणि वाहनप्रेमींसाठी २१ ते २३ सप्टेंबर २०२६ या कालावधीत पुण्यात एका विशेष ब्रँड अनुभवाचे आयोजन करत आहे. पुणे ॲक्टिव्हेशनची रचना ग्राहक आणि ब्रँड अनुभव म्हणून करण्यात आली आहे. त्यामध्ये निवडक निमंत्रितांना विशेष ड्राईव्ह अनुभव, व्यक्तिगत उत्पादन प्रात्यक्षिके आणि ब्रँडची सविस्तर माहिती दिली जाईल. लोटस इलेट्रे ही ब्रँडची संपूर्ण इलेक्ट्रिक हायपर-एसयूव्ही आहे. यामध्ये जबरदस्त कामगिरी, प्रगत तंत्रज्ञान आणि दैनंदिन उपयुक्तता यांचा संगम साधण्यात आला आहे. ही गाडी लोटससाठी एका नव्या पर्वाचे प्रतिनिधित्व करणारी असून ती या ब्रँडच्या समानार्थी असलेली कामगिरी करून दाखविते. त्याचसोबत एका लक्झरी एसयूव्हीकडून अपेक्षित असलेली बहुविध उपयोगिताही देते. लोटस कार्स इंडियाच्या संचालिका एमी अरोरा म्हणाल्या, "आमच्या जाणकार ग्राहकांसाठी सर्वोत्तम दर्जाचे ब्रँड्स आणि अनुभव घेऊन येणे हा आमचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. उत्कृष्टतेला नवे अर्थ देणारे आणि संपूर्ण उद्योगासाठी उच्च मानकांना प्रेरणा देणारे मापदंड स्थापित करण्यावर आमचा विश्वास आहे. अढळ निर्धार आणि 'ग्राहक प्रथम' हे तत्त्वज्ञान यांमुळे आम्ही इतरांपेक्षा वेगळे ठरतो, त्यामुळे प्रगतीची पातळी सतत उंचावण्याची आणि आमच्या ग्राहकांशी दीर्घकाळ टिकणारे नातेसंबंध निर्माण करण्याची आम्हाला प्रेरणा मिळते. त्याच वेळी, सर्वसमावेशक विक्री आणि विक्रीपश्चात सेवेच्या आधारावर संपूर्ण भारतात मालकीचा एक सुरळीत अनुभव देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत." केवळ वाहनांचे प्रदर्शन करण्यापलीकडे पुण्यातील हा उपक्रम म्हणजे देशभरात आपली उपस्थिती वाढवण्याच्या आणि प्रमुख लक्झरी बाजारपेठांमधील ग्राहकांशी असलेले संबंध अधिक दृढ करण्याच्या लोटस कार्स इंडियाच्या कटिबद्धतेचे प्रतीक आहे. लोटसने अशाच प्रकारचे रोडशो अनेक शहरांमध्ये आयोजित केले असून त्यांना ग्राहक आणि वाहनप्रेमींकडून सातत्याने उत्साही प्रतिसाद मिळाला आहे.

## यूथ4इम्पॅक्टचा शुभारंभ

■ देशभरातील ३,६०० हून अधिक तरुणांना नेतृत्वासाठी तयार करण्याचा उपक्रम

■ पुणे (दै. संध्या)

तरुणांमध्ये नेतृत्वगुण विकसित करण्याच्या उद्देशाने देशव्यापी युवा नेतृत्व विकास कार्यक्रम यूथ4इम्पॅक्टचा शुभारंभ बेंगळुरू येथील पीईएस विद्यापीठात करण्यात आला. बेंगळुरूमधील सुमारे ६०० तरुण या कार्यक्रमात सहभागी होणार असून, देशभरातील ३,६०० हून अधिक तरुणांना या उपक्रमाशी जोडण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. १८ वर्षांवरील विद्यार्थी करू शकतात अर्ज जागृती यात्रा आणि भारतातील एआयईएसईसी यांच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या यूथ4इम्पॅक्टला रिलायन्स फाउंडेशन, रिलायन्स कन्झ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेड आणि भारतातील एआयईएसईसी यांच्या भागीदारीतून तरुणांना शिकण्यासाठी, नेतृत्व करण्यासाठी आणि कृती करण्यासाठी सक्षम करणे, तसेच हा अनुभव जागृती यात्रा २०२६च्या माध्यमातून पुढे नेण्यास मदत करणे, हे आमचे उद्दिष्ट आहे.

यूथ4इम्पॅक्टचा मुख्य उद्देश नेतृत्व विकास केवळ शैक्षणिक ज्ञान आणि व्यावसायिक कौशल्यांपुरता मर्यादित न ठेवता तरुणांना समाज, समुदाय आणि त्यांच्या आजूबाजूच्या वास्तविक परिस्थितीशी जोडणे हा आहे. यूथ4इम्पॅक्टसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत २४ सप्टेंबर २०२६ आहे. १८ वर्षे किंवा त्याहून अधिक वयाचे विद्यार्थी बेंगळुरू, पुणे, कोलकाता, सुरत, हैदराबाद, विशाखापट्टणम आणि दिल्ली येथून अर्ज करू शकतात. कार्यक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या सहभागी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण आणि व्यावसायिक अनुभवाशी संबंधित संधीही उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. या कार्यक्रमांतर्गत सहभागी तरुणांना शिक्षण, रोजगार व करिअरसाठी तयारी, पर्यावरण संरक्षण आणि विशेष काळजीची गरज असलेले समुदाय या चार प्रमुख क्षेत्रांमध्ये नेतृत्व विकासाचे प्रशिक्षण आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन दिले जाईल. त्यानंतर स्वयंसेवी उपक्रम आणि समुदाय सहभागाच्या माध्यमातून सहभागी आपल्या शिकलेल्या ज्ञानाचा प्रत्यक्ष परिस्थितीत उपयोग करतील. या कार्यक्रमाद्वारे तरुणांना त्यांच्या परिचित वातावरणाच्या पलीकडे जाऊन विविध समुदाय आणि दृष्टिकोन समजून घेण्याची संधी दिली जाणार आहे. या अनुभवातून त्यांच्यामध्ये संवेदनशीलता, सहकार्याची भावना, जबाबदारीची जाणीव तसेच त्यांच्या आसपासची आव्हाने आणि संधी यांची अधिक व्यावहारिक समज विकसित होण्यास मदत होईल.

यूथ4इम्पॅक्टचा उद्देश तरुणांकडून गुंतागुंतीच्या सामाजिक समस्यांचे तात्काळ निराकरण करून घेणे नसून, त्यांना असा अनुभव आणि दृष्टिकोन देणे हा आहे,

> कार्यक्रमादरम्यान उत्कृष्ट नेतृत्वगुणांचे प्रदर्शन करणाऱ्या सहभागी विद्यार्थ्यांना विशेष संधीही दिल्या जातील. यूथ4इम्पॅक्टमधून निवड झालेल्या २० सहभागी विद्यार्थ्यांना जागृती यात्रा २०२६मध्ये सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. या यात्रेदरम्यान त्यांना देशभरातील विविध नेतृत्वकर्ते, संस्था आणि विचारप्रवाह यांच्याशी परिचित होण्याची तसेच आपल्या अनुभवाधारित ज्ञानाचा अधिक विकास करण्याची संधी मिळेल.

ज्यामुळे भविष्यात या आव्हानांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन विकसित होईल. भविष्यात व्यावसायिक, उद्योजक, शिक्षक, लोकसेवक, व्यावसायिक नेतृत्वकर्ते आणि संस्थानिर्माते म्हणून समाजासाठी अर्थपूर्ण योगदान देण्यासाठी हा अनुभव त्यांना अधिक सक्षम करेल. जागृती यात्रेचे मुख्य परिचालन अधिकारी चिन्मय वाडनेरे म्हणाले, "जागृतीचा नेहमीच असा विश्वास राहिला आहे की, तरुण जेव्हा आपल्या परिचित वातावरणाच्या पलीकडे जातात आणि त्यांनी यापूर्वी न पाहिलेल्या भारताचा अनुभव घेतात, तेव्हा त्यांना स्वतःच्या क्षमतेची जाणीव होते. यूथ4इम्पॅक्टच्या माध्यमातून हा विश्वास हजारो तरुणांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे. या उपक्रमात ज्ञान आणि कौशल्यांसोबत दृष्टिकोन, संवेदनशीलता आणि प्रत्यक्ष सामुदायिक अनुभव यांची सांगड घातली जात आहे.

## पॉकेटफुलकडून पुण्यात नवीन शाखेचे उद्घाटन

■ पुणे (दै. संध्या)

पॉकेटफुल या सेबी-नोंदणीकृत नेक्स्ट-जनरेशन इन्व्हेस्टिंग आणि ट्रेडिंग प्लॅटफॉर्मने पुण्यात आपली नवीन शाखा डीएनके स्क्वेअर, रामवाडी चौक, एयरपोर्ट रोड, पुणे येथे सुरू केली आहे. यासह कंपनीने महाराष्ट्रातील आपली उपस्थिती अधिक दृढ केली आहे. राज्यातील मोठ्या संख्येने गुंतवणूकदार आधीच कंपनीच्या ऑनलाइन प्लॅटफॉर्मचा वापर करत असताना हे नवीन कार्यालय कंपनीला विद्यमान ग्राहकांशी अधिक दृढ संबंध निर्माण करण्यास आणि पुण्यातील बाजारपेठेतील सहभागी, उद्योजक व सक्रिय ट्रेडर्सच्या वाढत्या समुदायाशी जोडले जाण्यास मदत करेल.



हे नवीन कार्यालय व्यवसाय विकास, ग्राहक संपादन आणि धोरणात्मक सहयोगांसाठी स्थानिक केंद्र म्हणून कार्य करेल. आपल्या विस्ताराचा भाग म्हणून, पॉकेटफुल विक्री, रिलेशनशिप मॅनेजमेंट आणि इतर व्यवसाय-संबंधित विभागांमध्ये कर्मचाऱ्यांची भरती करण्याची योजना आखत आहे. ही टीम ग्राहकांशी संवाद अधिक सुलभ संवाद साधण्यासाठी, व्यवसायाच्या नवीन संधी शोधण्यासाठी आणि पुण्याच्या आर्थिक व व्यावसायिक परिसंस्थेमध्ये परस्परसंबंध निर्माण करण्यासाठी काम करेल.

पुण्यातील हे कार्यालय शहरातील अधिकाधिक जाणकार गुंतवणूकदार वर्गाच्या गरजा पूर्ण करण्याच्या पॉकेटफुलच्या प्रयत्नांनाही पाठबळ देईल. कंपनीची प्रीमियम सेवा लेजेंड्स सानुकूलित ब्रोकरेज रचना आणि निवडक प्रायव्हेट-मार्केट संधींचा लाभ उपलब्ध करून देते. ही सेवा अधिक विशेषीकृत गुंतवणूक अनुभवाच्या शोधात असणारे सक्रिय ट्रेडर्स, सीएक्सओ, अनिवासी भारतीय (एनआरआय) आणि फॅमिली ऑफिसेसच्या गरजा लक्षात घेऊन डिझाइन करण्यात आली आहे.

या घडामोडीबाबत मत व्यक्त करत पॉकेटफुलचे सर्वम गोयल म्हणाले, "आम्हाला पुण्यासारख्या गतिमान आर्थिक परिसंस्था आणि अधिकाधिक माहितीपूर्ण गुंतवणूकदार समुदाय असलेल्या शहरात आमची प्रत्यक्ष उपस्थिती अधिक दृढ करताना अत्यंत आनंद होत आहे. या पुढाकारामधून आमचे डिजिटल व्यासपीठ आणि दृढ स्थानिक उपस्थिती यांची सांगड घालण्याचे आमचे व्यापक धोरण दिसून येते. यामुळे आम्हाला बाजारपेठेच्या गरजा अधिक बारकाईने समजून घेणे आणि ग्राहकांना अधिक मूल्य प्रदान करणे शक्य होईल. आम्ही पुण्यामध्ये सक्षम टीम उभी करण्यासाठी, तसेच पुण्यातील बदलत्या गुंतवणूक क्षेत्रात योगदान देण्यासाठी उत्सुक आहोत."

नवी दिल्ली येथे मुख्यालय असलेली आणि नोएडा व चेन्नईमध्ये कार्यरत कार्यालये असलेली पॉकेटफुल प्रमुख बाजारपेठांमध्ये आपली उपस्थिती अधिक दृढ करत आहे. देशभरात विस्तृत नेटवर्क उभे करताना कंपनी पंजाब, गुजरात आणि पश्चिम बंगालमध्येही प्रादेशिक कार्यालये स्थापन करण्याची योजना आखत आहे.

## ड्रीमे टेक्नॉलॉजीचा भारतात 'एक्स६० अल्ट्रा कम्प्लीट' रोबोट व्हॅक्यूम दाखल

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

स्मार्ट घरगुती तंत्रज्ञान क्षेत्रातील ड्रीमे टेक्नॉलॉजीने भारतात आपला प्रमुख 'एक्स६० अल्ट्रा कम्प्लीट' रोबोट व्हॅक्यूम सादर केला आहे. अधिक बुद्धिमान स्वच्छता, शक्तिशाली सक्शन आणि घरातील विविध अडथळ्यांवर मात करण्याच्या क्षमतेसह हे उत्पादन विकसित करण्यात आले आहे. केवळ ७.९५ सेंमी जाडी असलेला हा ड्रीमेचा सर्वात पातळ रोबोट व्हॅक्यूम असून, पलंग, सोफा आणि कपाटांखालील कमी उंचीच्या जागांमध्येही तो पोहोचू शकतो. मागे घेता येणाऱ्या डीटीओएफ सेन्सरमुळे मोकळ्या जागेत ३६० अंश परिसराचे परीक्षण करता येते. दोन कृत्रिम बुद्धिमत्ता कॅमेऱ्यांच्या साहाय्याने २८० हून अधिक प्रकारच्या वस्तू ओळखून त्यांना टाळण्याची क्षमता असल्याचा कंपनीचा दावा आहे.




■ ३५,००० पास्कल सक्शन क्षमता; ७.९५ सेंमी जाडी, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित स्वच्छता प्रणाली

ड्युअल फ्लेक्स आर्म तंत्रज्ञानामुळे साईड ब्रश आणि मॉप पॅड अरुंद कोपऱ्यांपर्यंत पोहोचतात. तसेच फ्लेक्सीअडॅप्ट प्रणाली ४.२ सेंमीपर्यंतच्या एक-स्तरीय आणि ८ सेंमीपर्यंतच्या दोन-स्तरीय अडथळ्यांवरून जाण्यासाठी तयार करण्यात आली आहे. एक्स६० अल्ट्रा कम्प्लीटमध्ये ३५,००० पास्कल सक्शन क्षमता देण्यात आली आहे. प्रेशरस्ट्रीम डिटँगलिंग ड्युओब्रश प्रणालीमुळे धूळ, कचरा आणि केसांचे गुंते साफ करण्यावर भर देण्यात आला आहे. फरशी तसेच गालिच्यांवर प्रभावी स्वच्छता करण्यासाठी ही प्रणाली विकसित करण्यात आली आहे.

मॉपिंगसाठी १०० अंश सेल्सिअसपर्यंत पाणी वापरणारी थर्मोहब प्रणाली देण्यात आली आहे. कंपनीच्या म्हणण्यानुसार, यामुळे मॉप पॅडवरील तेलकटपणा आणि हट्टी डाग साफ करण्यास मदत होते. याशिवाय २३० आरपीएम ड्युअल ओम्नी-स्क्रब मॉपिंग आणि १५ न्यूटनपर्यंत खालील दाब देण्याची क्षमता आहे.

## ॲमेझॉन पेकडून एचडीएफसी एर्गोसोबत सहयोगाने आरोग्य विमा लाँच

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

ॲमेझॉन पेने ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये एचडीएफसी एर्गो जनरल इन्शुरन्स कंपनीसोबत सहयोगाने ॲमेझॉन.इन वर डिजिटल, सेल्फ-सर्व्ह आरोग्य विमा खरेदी प्रक्रिया सुरू केली आहे. हा अनुभव ग्राहकांना आरोग्य योजनेत नेमके काय समाविष्ट आहे हे समजून घेण्यास मदत करतो आणि स्पॅम कॉल्स किंवा शाखेत जाण्याची आवश्यकता पूर्णपणे दूर करून मार्गदर्शित, डू-इट-युअरसेल्फ डीआयवाय प्रक्रियेद्वारे अर्ज पूर्ण करण्याची सुविधा देतो. खरेदीची ही प्रक्रिया प्रत्यक्ष ॲमेझॉन पेवरील हेल्थ इन्शुरन्स पेजमध्ये जोडलेली आहे आणि यामध्ये एचडीएफसी एर्गो ऑप्टिमा सिक्युअर+ सादर करण्यात आली आहे. ग्राहक या पेजवर येताच कव्हरेजचे तपशील पाहू शकतात, योजनेतील संरक्षणाची माहिती तपासू शकतात आणि स्वतःहून खरेदी पूर्ण करू शकतात. ही प्रक्रिया एचडीएफसी एर्गोच्या अनेक वर्षांच्या सखोल अनुभवावर आधारित डिझाइन करण्यात आली आहे, जी विनासायास डीआयवाय अनुभव प्रदान करते, तसेच योग्य आरोग्य विमा पर्याय निवडू इच्छिणाऱ्या आणि आरोग्याशी संबंधित आणीबाणीच्या प्रसंगी सुरक्षित राहू पाहणाऱ्या डिजिटल-सजग ग्राहकांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. "आज भारतातील नागरिक आरोग्याविषयी अधिक जागरूक होत आहेत, तरीही त्यांच्यापैकी बहुतांश व्यक्तींकडे विमा नाही, कारण खरेदी प्रक्रियेदरम्यान त्यांच्या काही शंकांचे निरसन होत नाही. आम्हाला एचडीएफसी एर्गो जनरल इन्शुरन्ससोबत सहयोग करताना आणि त्यांची प्रमुख आरोग्य विमा योजना ऑप्टिमा सिक्युअर+ उपलब्ध करून देताना आनंद होत आहे.




महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## ई-निविदा सूचना

महावितरणकडे नोदणीकृत असलेल्या नामांकित व अनुभवी पुरवठादार व कंत्राटदार यांचे कडून पिंपरी विभागा अंतर्गत खालील सामानांचा पुरवठा/कामे करण्यासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| निविदा क्रं. का.अ./पिंपरी/२६-२७ | कामाचा तपशील | निविदा रक्कम रू. |
|---|---|---|
| टी-०६ | महावितरण पिंपरी विभाग अंतर्गत सर्व कार्यालयाच्या ईमारती व आजूबाजूचा परिसर स्वच्छतेची वार्षिक कामे पुरविण्याकरता. | १० लाख |

अधिक तपशीलासाठी कृपया https://etender.mahadiscom.in/eatApp/ या संकेतस्थळाला भेट द्यावी.

पी. आर. ओ. क्रं.१३८/२०२६-२७ — कार्यकारी अभियंता, पिंपरी विभाग

## थोडक्यात पण महत्वाचे



### कवितांच्या बहारदार मैफलीने पिंपरी-चिंचवड महोत्सवात रंगत

**चिंचवड: दैनिक संध्या**

पिंपरी-चिंचवड महोत्सवाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या बहारदार कवीसंमेलनात विविध विषयांवरील कवितांनी रसिकांची मने जिंकली. शब्द, भावना, विचार आणि सामाजिक भान यांचा सुंदर संगम या कवीसंमेलनातून अनुभवायला मिळाला. कवीसंमेलनाच्या प्रारंभी आदरणीय विरोधी पक्षनेते तथा लोकनेते भाऊसाहेब भोईर यांचा काव्यपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थित रसिक, साहित्यिक आणि कलाकारांना संबोधित करताना भाऊसाहेब भोईर यांनी मनोगत व्यक्त केले. "पुणे ही जर महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी असेल, तर पिंपरी-चिंचवड ही सांस्कृतिक उपराजधानी आहे," असे नमूद करत त्यांनी पिंपरी-चिंचवडकर कला, साहित्य, संस्कृती तसेच विविध क्षेत्रांत कुठेही कमी नाहीत, असे सांगितले. पिंपरी-चिंचवड महोत्सव तब्बल दहा वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर पुन्हा एकदा सुरू झाल्याने गणेशभक्त, रसिक, साहित्यिक आणि कलाकारांमध्ये आनंदाची लहर निर्माण झाली असल्याचेही त्यांनी नमूद केले. या कवीसंमेलनात वंदना इन्नानी, राजेंद्र घावटे, तुकाराम पाटील, जयश्री श्रीखंडे, शोभा जोशी, राधाबाई वाघमारे, सुरेश कंक, अरुण कांबळे, पौर्णिमा कोल्हे, निलेश शेंबेकर, दिनेश भोसले, सविता इंगळे, देवेंद्र गावंडे, प्रदीप गांधलीकर, पितांबर लोहार, सुभाष चव्हाण, झुबेन शेख, नीलिमा फाटक, सुप्रिया लिमये, हेमंत जोशी, माधुरी डिसुझा, हिंगणकर कवी, संजय सिंगलवार, आय. के. शेख, रेणुका हजारे, संदीप चव्हाण, माधुरी विधाटे आणि अशोक टाकळे यांनी आपल्या दर्जेदार कविता सादर करत रसिकांना मंत्रमुग्ध केले. कधी सामाजिक वास्तवाचे भान जागवणाऱ्या, कधी नात्यांची हळवी वीण गुंफणाऱ्या, तर कधी जीवनातील विविध पैलूंवर भाष्य करणाऱ्या कवितांनी वातावरण भारावून गेले. प्रत्येक कवीच्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीला रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली. या संपूर्ण कवीसंमेलनाचे कैलास भैरट आणि सीमा गांधी यांनी बहारदार सूत्रसंचालन करत कार्यक्रमात रंगत आणली. त्यांच्या प्रभावी निवेदनशैलीमुळे कवी, कविता आणि रसिक यांच्यातील संवाद अधिकच खुलत गेला. पिंपरी-चिंचवडच्या समृद्ध साहित्यिक आणि सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणाऱ्या या कवीसंमेलनाने महोत्सवाच्या आनंदात सुंदर काव्यरंग भरला.

### पिंपरी चिंचवड महापालिकेकडून वाघेश्वर घाट परिसराचे सुशोभीकरण

**पिंपरी : दैनिक संध्या**



स्वच्छतेची सवय आणि सौंदर्यदृष्टीची जोड मिळाल्यास सार्वजनिक परिसराचे रूप पालटू शकते, याचा प्रत्यय वाघेश्वर घाट परिसरात आला. 'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या 'इ' क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने प्रभाग क्रमांक ३ मधील साठे नगर, चऱ्होली बु. येथील वाघेश्वर घाट परिसरात स्वच्छता आणि सुशोभीकरणाचा उपक्रम राबविण्यात आला. "सार्वजनिक परिसर स्वच्छ ठेवणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असून, स्वच्छता उपक्रमात नागरिकांचा सक्रीय सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे. स्वच्छतेसोबतच उपलब्ध जागांचे सुशोभीकरण आणि टाकाऊ वस्तूंचा सर्जनशील पुनर्वापर केल्यास परिसराचा संपूर्ण चेहरामोहरा बदलू शकतो. स्वच्छ, सुंदर पिंपरी चिंचवड घडविण्यासाठी नागरिकांचा सहभाग महत्वाचा आहे असे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले. स्वच्छता (लक्ष्य क्षेत्रांतर्गत) परिसरातील रस्त्यालगत तसेच सार्वजनिक ठिकाणी साचलेला कचरा आणि अस्वच्छता दूर करण्यात आली. उपलब्ध सार्वजनिक जागेची स्वच्छता करून तिचे सुशोभीकरण करण्यात आले. नागरिकांनी वापरात नसलेल्या तसेच टाकून दिलेल्या वस्तूंचा पुनर्वापर करून त्यांना रंगरंगोटी करण्यात आली. या वस्तूंचा कलात्मक वापर करून परिसराला आकर्षक स्वरूप देण्यात आले. "'स्वच्छता ही सेवा' अभियानाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयीची जाणीव अधिक दृढ करण्याचा प्रयत्न केला जात आहे. कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकणे आणि परिसर स्वच्छ ठेवणे या सवयी नागरिकांनी अंगीकारणे आवश्यक आहे. नागरिक, विद्यार्थी आणि विविध संस्थांच्या सहभागातून स्वच्छतेची ही चळवळ अधिक व्यापक होईल," असे उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी यावेळी सांगितले. स्वच्छतेसोबतच सार्वजनिक जागेच्या सौंदर्यीकरणाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमामुळे परिसराचे रूप पालटले. टाकाऊ वस्तूंचाही कल्पकतेने पुनर्वापर करून सार्वजनिक जागा अधिक आकर्षक करता येते, याचा सकारात्मक संदेश या उपक्रमातून देण्यात आला. यावेळी नागरिकांना ओला व सुका, सॅनिटरी, विशेष काळजी योग्य कचरा स्वतंत्रपणे संकलित करून महापालिकेच्या घंटागाडीतच देण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच उपस्थित नागरिक, विद्यार्थी आणि शिक्षकांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली. परिसर स्वच्छ ठेवण्यासोबतच स्वच्छता उपक्रमात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन महापालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### शिवसेना उबाठाची पिंपरी-चिंचवडमध्ये नवी संघटनात्मक बांधणी

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी-चिंचवड शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शहर कार्यकारिणीची घोषणा लवकरच होणार आहे. शहरप्रमुख चेतन पवार यांनी कार्यकारिणीसाठी निवडलेल्या सक्रिय व सक्षम कार्यकर्त्यांची यादी सोमवारी (दि.२१) मुंबई येथे पक्षाचे नेते खासदार संजय राऊत यांच्याकडे सुपूर्द केली. त्यामुळे नव्या शहर कार्यकारिणीच्या अधिकृत घोषणेकडे पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि इच्छुकांचे लक्ष लागले आहे. पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने जून २०२६ मध्ये पिंपरी, चिंचवड आणि भोसरी या तिन्ही विधानसभा मतदारसंघांतील इच्छुक कार्यकर्त्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या होत्या. प्रत्येक प्रभागातील विविध जबाबदाऱ्या सांभाळण्यासाठी इच्छुक असलेल्या कार्यकर्त्यांची संघटनात्मक क्षमता, पक्षातील सक्रिय सहभाग, सामाजिक कामातील योगदान तसेच पक्षाच्या कार्यक्रमांमधील सहभाग यांचा विचार करण्यात आला. शहरप्रमुख चेतन पवार म्हणाले, "केवळ पदाची इच्छा व्यक्त करणाऱ्या कार्यकर्त्यांऐवजी प्रत्यक्ष मैदानात सक्रियपणे काम करणाऱ्या आणि पक्ष संघटना वाढविण्याची क्षमता असलेल्या कार्यकर्त्यांना कार्यकारिणीत संधी देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. प्रभागनिहाय कार्यकर्त्यांच्या मुलाखती घेऊन त्यातून सक्षम कार्यकर्त्यांची निवड करण्यात आली आहे." गणेशोत्सवाच्या कालावधीतही शहरातील विविध प्रभागांमध्ये कार्यकर्त्यांच्या भेटीगाठींवर भर देण्यात आला. या माध्यमातून स्थानिक पातळीवरील संघटनात्मक परिस्थिती, कार्यकर्त्यांचा सहभाग आणि पक्षाच्या कामकाजाबाबतची माहिती जाणून घेण्यात आली. त्यामुळे नव्या कार्यकारिणीत प्रभागनिहाय सक्रिय कार्यकर्त्यांना प्रतिनिधित्व मिळण्याची शक्यता आहे. नव्या कार्यकारिणीच्या माध्यमातून आगामी काळात पिंपरी-चिंचवडमध्ये पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यावर भर दिला जाणार आहे.



# पवना नदी पुन्हा फेसाळली

**रसायनयुक्त व मैलामिश्रित पाण्यामुळे प्रदूषणाचा गंभीर प्रश्न,**

■ **पिंपरी : (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरातून वाहणारी पवना नदी पुन्हा एकदा फेसाळल्याचे चित्र समोर आले आहे. नदीपात्रात रसायनयुक्त तसेच मैलामिश्रित सांडपाणी थेट सोडले जात असल्याने चिंचवड येथील केजुबाई बंधाऱ्याजवळ मोठ्या प्रमाणावर पांढरा फेस तयार झाला आहे. या प्रकारामुळे नदीच्या प्रदूषणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

स्थानिक नागरिक आणि पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केलेल्या चिंतेनुसार, नदीपात्रात सोडल्या जाणाऱ्या रसायनमिश्रित व सांडपाण्यामुळे पाण्याच्या गुणवत्तेवर गंभीर परिणाम होत असून जलचर जीवसृष्टी धोक्यात आली आहे. नदीतील वाढत्या प्रदूषणामुळे पर्यावरणासह नागरिकांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

पवना नदीवरील जलस्रोतांचा वापर शहरातील पाणीपुरवठ्यासाठी होत असल्याने या प्रदूषणाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. नदीतील फेस आणि प्रदूषणामुळे नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात असून संबंधित यंत्रणांनी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.दरम्यान, पवना नदीपात्रात रसायनयुक्त आणि मैलामिश्रित सांडपाणी सोडणाऱ्या उद्योगांवर तसेच संबंधित घटकांवर महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने (MPCB) कठोर कारवाई करावी, अशी मागणी पर्यावरणप्रेमी आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे. तसेच नदी प्रदूषणाच्या स्रोतांचा शोध घेऊन दोषींवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणीही जोर धरू लागली आहे.

## आमदार अमित गोरखे यांच्या ताफ्याचा नाशिकमध्ये अपघात




■ **पिंपरी (दै. संध्या)**

अनुसूचित जातींच्या (SC) आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ नाशिक येथे आयोजित करण्यात आलेल्या महामोर्चाच्या निमित्ताने नाशिकमध्ये असताना, विधान परिषद आमदार अमित गोरखे यांच्या वाहनाचा अपघात झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. सुदैवाने, या अपघातात आमदार अमित गोरखे व त्यांच्यासोबत असलेले सर्व सहकारी थोडक्यात बचावले असून, सर्वजण पूर्णपणे सुरक्षित आहेत.

अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण व्हावे, या अत्यंत महत्त्वाच्या आणि न्याय्य मागणीसाठी राज्यभरात आंदोलन, मोर्चे केली जात आहेत. याच पार्श्वभूमीवर नाशिक येथे एका भव्य महामोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या महामोर्चात वंचित व उपेक्षित घटकांच्या हक्कासाठी सातत्याने आक्रमक भूमिका मांडणारे आमदार अमित गोरखे देखील सहभागी झाले होते. याच दौऱ्यादरम्यान नाशिकमध्ये हा अपघात घडला. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, नाशिकमधील दौऱ्यादरम्यान आमदार अमित गोरखे यांच्या वाहनाची दुसऱ्या एका वाहनाशी अचानक धडक झाली.

या दुर्घटनेत आमदार अमित गोरखे यांच्या मानेला किरकोळ दुखापत झाली असून, तातडीने त्यांना वैद्यकीय मदत व प्राथमिक उपचार देण्यात आले आहेत. सध्या त्यांची प्रकृती पूर्णपणे स्थिर असून चिंतेचे कोणतेही कारण नाही. त्यांच्यासोबत असलेले सर्व सहप्रवासी, चालक आणि सुरक्षा रक्षक देखील सुखरूप आहेत. घटनेची माहिती समजताच संपूर्ण महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांमध्ये काहीशी खळबळ उडाली होती. आमदार अमित गोरखे यांनी सातत्याने समाजहिताच्या आणि उपवर्गीकरणाच्या प्रश्नावर शासनाकडे आणि जनतेसमोर आपली ठाम भूमिका मांडली आहे.

## अनधिकृत केबल्स तात्काळ हटवा अन्यथा कठोर कारवाईचा आयुक्त यांचा इशारा



■ **पिंपरी (दै. संध्या)**

अनधिकृतपणे टाकण्यात आलेल्या केबल्समुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होण्याबरोबरच शहराच्या सौंदर्यावरही परिणाम होत आहे. त्यामुळे केबल ऑपरेटर्सनी दूरसंचार कायद्यानुसार तसेच महापालिकेच्या नियमांनुसार आवश्यक त्या परवानग्या घेऊनच केबल्स टाकणे गरजेचे आहे. वृक्ष, विद्युत खांब, इमारती, फुटपाथ अथवा इतर अनधिकृत ठिकाणी टाकण्यात आलेल्या केबल्स संबंधित ऑपरेटर्सनी तातडीने हटवाव्यात अन्यथा कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिला.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील ओव्हरहेड केबल्सचे नियमन तसेच प्रस्तावित मानक कार्यपद्धती (SOP) संदर्भात केबल ऑपरेटर्सच्या प्रतिनिधींसमवेत पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात बैठक आयोजित करण्यात आली, त्यावेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी बोलत होते.

या बैठकीस उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, शहर सुधारणा समिती सभापती संजय नाना काटे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, नगरसदस्य कुणाल वाव्हळकर, उत्तम केंदळे, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, सह शहर अभियंता अनिल भालसाकळे, महेश कावळे, उप आयुक्त राजेश आगळे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह संबंधित विभागांचे उपअभियंता, कर्मचारी तसेच विविध केबल ऑपरेटर कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## कै. पिसाळ यांच्या स्मरणार्थ रक्तदान स्पर्धेला नागरिक व मंडळांचा प्रतिसाद

■ **आकुर्डी (दै. संध्या)**




कै. आदित्य नानासाहेब पिसाळ यांच्या स्मरणार्थ आपुलकी मित्र मंडळ, आकुर्डी यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान स्पर्धेला नागरिक तसेच विविध सार्वजनिक मंडळांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमात विविध मंडळांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत तब्बल १२६ नागरिकांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

या स्पर्धेत मंडळांच्या रक्तदानातील सहभागाच्या आधारे प्रथम क्रमांकाचे २५,००० रूपये रोख पारितोषिक भैरवनाथ मित्र मंडळ, आकुर्डी गाव यांनी पटकावले. द्वितीय क्रमांकाचे १५,००० रूपये रोख पारितोषिक तेज मित्र मंडळ, दत्तवाडी, तर तृतीय क्रमांकाचे ७,००० रूपये रोख पारितोषिक जगदंब प्रतिष्ठान यांनी मिळविले. रक्तदान करणाऱ्या सर्व नागरिकांसाठी आयोजित लकी ड्रॉमध्ये एक ग्रॅम सोन्याच्या नाण्याचे विजेते रितेश गायकवाड, आकुर्डी, तर सायकलचे विजेते मयूर पवार, ताथवडे ठरले. या उपक्रमासाठी संजीवनी ब्लड बँकेचे विशेष सहकार्य लाभले.कार्यक्रमासाठी माजी नगरसेवक प्रसाद शेट्टी, उद्योजक अमित बाबर, आयुष निंबारकर, पायल ज्वेलर्स दत्तवाडी, आणि स्काय ब्लू हॉटेल यांनी प्रायोजक म्हणून मोलाचे सहकार्य केले. त्यांच्या सहकार्यामुळे या सामाजिक उपक्रमाला मोठे पाठबळ मिळाले.या कार्यक्रमास उद्योजक उमेशभाऊ चांदगुडे, माजी नगरसेवक प्रसाद शेट्टी, क्रीडा व सांस्कृतिक समितीचे सभापती कैलास कुटे, नगरसेविका वैशालीताई काळभोर, नगरसेविका शैलजाताई मोरे, उद्योजक अमित बाबर, कुणाल लांडगे, बाबू शेट्टी, रणजित सोलंकी, जालिंदर काळभोर, महेश काटे, नानासाहेब पिसाळ, नितीन काकडे, टाटा मोटर्स युनियनचे माजी कार्याध्यक्ष अशोक माने आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इखलास सय्यद, रमेश भोरकर, अभिजित पिसाळ, शाहरुख शेख, जावेद पठाण, सूरज मोरे, शुभम वरकुड, अमोल जैस्वार, निलेश कदम, सनी गोडसे, समाधान, दाजी चोपडे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश परदेशी यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुनील मोरे यांनी केले.

नागरिक आणि विविध मंडळांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे रक्तदानाचा हा सामाजिक उपक्रम यशस्वी झाला. १२६ रक्तदात्यांच्या सहभागातून 'रक्तदान हेच खरे मानवतेचे दान' हा मानवतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचला. आपुलकी मित्र मंडळाच्या या उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक करण्यात आले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### चाकणला गाजतोय आमचं काय चुकलं जिवंत देखावा

**चाकण : दैनिक संध्या**

सार्वजनिक गणेश उत्सव मंडळांकडून चाकणला यंदा जिवंत देखाव्यातून प्रचंड समाज प्रबोधन होऊ लागले आहे. येथील नवयुग मित्र मंडळाने सादर केलेला आमचं काय चुकलं हा जिवंत देखावा प्रचंड गाजू लागला आहे. चाकण येथील गोल्डन चौकात नवयुग मित्र मंडळाने यंदा मंडळाचे अध्यक्ष नंदकुमार वाव्हळ, चाकण नगरपरिषदेचे नगरसेवक मंगेश कांडगे व उद्योजक योगेश गायकवाड यांच्या संकल्पनेतून आमचं काय चुकलं हा जिवंत देखावा सादर केला आहे. या मंडळाला यंदा गणराया अवार्ड हा मानाचा पुरस्कार मिळाला आहे. महात्मा फुले मित्र मंडळाने यंदा विषाचा घास अर्थात तुकाराम मुंढेचा फास हा जिवंत देखावा तर, त्रिमूर्ती मित्र मंडळाने यंदा एकटा पडलेला बाप हा जिवंत देखावा सादर केला आहे. नवनाथ मित्र मंडळाने यंदा मी कामाचाच माणूस अजित पवार हा जिवंत देखावा, तर आझाद हिंद मंडळाने यंदा अंधश्रद्धेवर आधारित या बुवाने गंडवलं हा जिवंत सादर केला आहे. चाकण बाजारपेठेतील समस्त बालवीर मंडळाने मंडळाचे अध्यक्ष संजय वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली खंडोबा बानूबाई विवाह सोहळा हा जिवंत देखावा सादर केला आहे. चाकण पंचक्रोशीत गणेश उत्सव निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी चाकण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली चाकण नगरपरिषद हद्दीत पोलिसांचा कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.



### बुद्धिबळ स्पर्धेत चैतन्य विद्यालयाचे घवघवीत यश

**नारायणगाव: दैनिक संध्या**

जिल्हा क्रीडा परिषद, पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे व श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने नुकत्याच जुन्नर तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा पार पडल्या. या क्रीडा स्पर्धेत ओतूर येथील चैतन्य विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्कृष्ट कामगिरी बजावत घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यालयातील एकूण १७ खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले होते,त्यापैकी ६ खेळाडूंची थेट जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ही जिल्हास्तरीय स्पर्धा पोदार इंटरनॅशनल स्कूल रोहकल, चाकण या ठिकाणी १० ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे. चैतन्य विद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख अमित झरेकर यांनी या निवडीची अधिकृत माहिती दिली. विविध वयोगटात चमकलेले यशस्वी खेळाडू त्यामध्ये १४ वर्षांखालील मुली: अनुश्री अर्जुन शिरसाठ (चौथा क्रमांक),१४ वर्षांखालील मुले: वरद रामदास डोंगरे (द्वितीय क्रमांक) आणि चिन्मय अभिजीत डुंबरे (पाचवा क्रमांक),१७ वर्षांखालील मुले: ओम बाळासाहेब आरोटे (द्वितीय क्रमांक), स्वराज तुकाराम गायकर (तृतीय क्रमांक) आणि श्रीराज श्रीकांत महाकाळ (पाचवा क्रमांक) या सहा विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले आहे. विद्यार्थ्यांच्या या नेत्रदीपक यशाबद्दल ग्राम विकास मंडळ ओतूरचे अध्यक्ष अनिल तांबे, प्रदीप गाढवे, मुख्याध्यापक प्रतीक अकोलकर, रघुनाथ तांबे, संजय हिरे, राजेंद्र डुंबरे, बाळासाहेब साबळे, पंकज घोलप, वनिता भोर आणि प्रभाकर तांबे यांनी सर्व विजेत्या खेळाडूंचे आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे विशेष कौतुक केले आहे. तसेच चाकण येथे होणाऱ्या पुढील जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी सर्व खेळाडूंना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.




### नेत्र शिबिरातून गरजूंच्या जीवनात दृष्टीचा प्रकाश

**नारायणगाव: दैनिक संध्या**

गरजू नागरिकांना दृष्टीचा प्रकाश मिळावा, या उद्देशाने नारायणगाव येथे रविवारी, २० सप्टेंबर रोजी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पद्मश्री डॉ. मनोहर डोळे मेडिकल फाउंडेशन, मोहन ठुसे नेत्र रुग्णालय, श्री नवनाथ मित्र मंडळ आणि रोटरी क्लब ऑफ नारायणगाव यांच्या संयुक्त सहकार्याने हा समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आला. शिबिरात गरजू रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करून आवश्यक रुग्णांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली. शस्त्रक्रियेसाठी येणाऱ्या रुग्णांना जेवण, निवास, औषधे तसेच काळ्या चष्म्याची सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात आली. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळाला. या उपक्रमासाठी आदित्य डिंबळे, अरबाज शेख, नवनाथ जोगदंड, अभि वाजगे, सौरभ ढवळे, उत्कर्ष शितोळे, ऋषिकेश वाजगे, जनसंपर्क अधिकारी रवींद्र कानडे यांच्यासह सहकाऱ्यांनी विशेष योगदान दिले. त्यांच्या सेवाभावी कार्याचे उपस्थितांनी कौतुक केले.गरजू रुग्णांना उपचाराची सुविधा उपलब्ध करून देत त्यांच्या जीवनात पुन्हा दृष्टीचा प्रकाश आणणारा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण ठरला.



# मुसळधार पावसामुळे महामार्गाला नदीचे स्वरूप

■ चाकण (दै. संध्या)

दिवसभर उकाड्याने त्रस्त झाल्याने नागरिकांना दमदार पावसामुळे दिलासा मिळाला असला तरी मुसळधार पावसाने अक्षरशः दाणादाण केली. या पावसामुळे महामार्गाला नदीचे स्वरूप आल्याने पादचारी व वाहनचालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला.

संपूर्ण चाकण पंचक्रोशीत ढगफुटीसारखा पाउस कोसळल्यामुळे सोमवारी ( दि.२१) दुपारी दोन नंतर येथील तळेगाव चौक व पुणे नाशिक महामार्गाला अक्षरशः नदीचे स्वरूप आले होते. रस्ते पाण्याखाली गेल्यामुळे वाहतूक संथ गतीने सुरू होती. त्यामुळे काही काळ महामार्गावर वाहतूक कोंडी झाली होती.

व्यापारी केंद्र असलेल्या चाकण शहरात आणि आसपासच्या परिसरात मुसळधार पावसाने नागरिकांना चांगले झोडपून काढले. कामगारांची दैना उडाली होती. दमदार पावसामुळे चाकणमधील जनजीवन विस्कळीत झाले असून, अनेक भागांत पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. मुसळधार पावसामुळे नाले आणि ओढे अनियंत्रित झाले असून अनेक ठिकाणी रस्ते पाण्याखाली गेले आहेत. या पावसाचा सर्वाधिक फटका वाहतूक व्यवस्थेला बसला आहे. पुणे - नाशिक महामार्गासह चिंबळी फाटा, स्पायसर चौक, आळंदी फाटा आणि चाकण मधील तळेगाव चौक, आंबेठाण चौक, वाकी सुंबरेनगर भागात महामार्ग पाण्याखाली गेले आहेत. त्यामुळे या प्रमुख मार्गांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. चाकण उद्योग नगरीतील अंतर्गत रस्त्यांची कामे सुरू असल्याने आणि पाण्याचा योग्य निचरा न झाल्याने चाकरमानी व कामगारांना कामावर पोहोचण्यासाठी तासनतास वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला.


चुकीच्या ठिकाणी बांधण्यात आलेल्या उड्डाणपूलांमुळे चाकणमध्ये दररोज मोठी वाहतूक कोंडी होते. कामगार व नागरिक मरणयातना सहन करत आहेत. महामार्गावर साचलेल्या पाण्याचा निचरा होण्यासाठी कसलाच स्त्रोत नसल्याने रस्त्यावर पाणी साचून वाहतुकीचा वेग प्रचंड मंदावला आहे. रस्त्यांची कामे होणे अपेक्षित आहे., असे सुवर्णाताई राक्षे, प्रथम महिला उपनगराध्यक्षा, चाकण यांनी सांगितले.

## गाडगीळवर तरुण मंडळात ह.भ.प.श्री. आनंद महाराज तांबे यांचे सुश्राव्य प्रवचन

■ कोरेगावमुळ(दै. संध्या)

आजच्या धावपळीच्या जीवनात माणसाने अध्यात्म, भक्ती आणि संस्कार यांची सांगड घालणे गरजेचे आहे. संतांच्या विचारातून माणसाला जीवन जगण्याची योग्य दिशा मिळते. नामस्मरण, सदाचार, सेवा आणि परोपकार या माध्यमातून जीवन अधिक आनंदी व अर्थपूर्ण करता येते.

प्रत्येकाने आपल्या कुटुंबात तसेच समाजात चांगले संस्कार रुजविण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन चिंचवड देवस्थानचे माजी विश्वस्त तथा अखिल भारतीय वारकरी मंडळाचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष ह.भ.प आनंद महाराज तांबे यांनी केले. गाडगीळवर तरुण मंडळाच्या वतीने धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ह.भ.प. आनंद महाराज तांबे (श्रीक्षेत्र थेऊर) यांचे प्रवचन आयोजित करण्यात आले होते. श्रीगुरु आदिनाथ वैष्णव योगपीठ सेवाभावी संस्था, आळंदी-पंढरपूर यांचे अध्यक्ष व कार्यकारी मंडळाच्या माध्यमातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रवचनाच्या माध्यमातून उपस्थित भाविकांना आध्यात्मिक विचार, भक्ती, संस्कार आणि जीवनमूल्यांची



प्रेरणा मिळाली व धार्मिक व आध्यात्मिक विचारांचा लाभ घेता यावा या उद्देशाने मंडळांच्या माध्यमातून प्रयत्न केले. यावेळी ओमकार कोलते, गणेश गावडे, दत्ता कोलते, भाऊसो गायकवाड, दादा कोलते, तेजस गवळी, नवनाथ गवळी, अनिल गवळी, पुणे जिल्हा महानुभाव परिषदेचे प्रचारमंत्री अमोल भोसले, गाडीवीर तरुण मंडळ गवळीमळा कानगाव अध्यक्ष, उपाध्यक्ष मंडळाचे सर्व पदाधिकारी सभासद, जेष्ठ नागरिक, आजी माजी पदाधिकारी, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

## रिसे तंटामुक्ती गाव समितीचा आरोग्यसेवेचा स्तुत्य उपक्रम



■ पुरंदर : (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील रिसे तंटामुक्ती गाव समितीचे अध्यक्ष हर्षद तुषार कानडे यांच्या पुढाकारातून व विशेष सहकार्याने रिसे येथे मोफत आरोग्य व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. तंटामुक्ती समिती रिसे यांच्या पुढाकाराने आणि भारती हॉस्पिटल, पुणे यांच्या विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला रिसे तसेच पंचक्रोशीतील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिबिराचे उद्घाटन पुरंदर-हवेली विधानसभा प्रमुख बाबाराजे जाधवराव तसेच माजी आमदार संजय जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य अजय कैलास इंगळे आणि पंचायत समिती सदस्य माऊली यादव यांची प्रमुख उपस्थिती होती.

भारती विद्यापीठ, पुणे यांच्या वैद्यकीय पथकाकडून नागरिकांची मोफत आरोग्य व नेत्र तपासणी करण्यात आली. तसेच तपासणीनंतर नागरिकांना आवश्यक वैद्यकीय सल्ला देण्यात आला. तपासणीदरम्यान मोतीबिंदूचे निदान झालेल्या गरजू रुग्णांना पुढील उपचार व शस्त्रक्रियेसाठी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच अनेक नागरिकांच्या डोळ्यांचा नंबर तपासून सवलतीच्या दरात चष्म्यांची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली. कार्यक्रमास ग्रामपंचायत सदस्य विद्या सोमनाथ चव्हाण, उमेश नारायण कांबळे, रवींद्र कामठे, माजी सरपंच रमेश पिसाळ, संजय बोरकर, उपसरपंच सुरेश गायकवाड यांच्यासह गावातील आजी-माजी पदाधिकारी, तरुण व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या गावातच दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देणारा हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.

या शिबिरामुळे नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता वाढण्यास मदत झाली असून, तंटामुक्ती गाव समितीच्या या सामाजिक उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक करण्यात आले.

## तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात विविध उपक्रम

■ बारामती (दै. संध्या)

जागतिक ओझोन दिनानिमित्त तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागात पर्यावरण विषयांतर्गत विविध शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांसाठी पोस्टर प्रदर्शन आणि तज्ज्ञांच्या व्याख्यानांचा समावेश होता.

इयत्ता अकरावी कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी ओझोन दिनानिमित्त पोस्टर प्रदर्शन आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत एकूण ३० पोस्टर्स तयार केले. ओझोनचे महत्त्व, ओझोन थराचे संरक्षण आणि पर्यावरण संवर्धन या विषयांवर विद्यार्थ्यांनी आकर्षक व माहितीपूर्ण पोस्टर्स सादर केली.

इयत्ता अकरावी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी प्रा. संजय खोमणे यांचे 'ओझोनचे महत्त्व' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. तसेच २१ सप्टेंबर २०२६ रोजी कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा आयक्यूएसी समन्वयक डॉ. अरुण मगर यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. 'ओझोन वायूचे महत्त्व व संवर्धन' या विषयावर त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. गोरखनाथ मोरे, पर्यवेक्षक प्रा. संजय शेंडे आणि समन्वयक प्रा. रमेश गोसावी यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे आयोजन पर्यावरण विभागप्रमुख सौ.अनिता पाटील तसेच सहकारी शिक्षक प्रा.पांडुरंग ओवेकर आणि प्रा.उदय कळंत्रे यांनी केले.



# नारायणगाव एसटी डेपोला तीन नवीन बसेसची सेवा सुरू

■ नारायणगाव(दै. संध्या)

जुन्नर तालुक्याचे आमदार शरददादा सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याने नारायणगाव एसटी डेपोला तीन नवीन बसेस उपलब्ध झाल्या.या बसेसची विधिवत पूजा करून सेवेला सुरुवात करण्यात आली.

नारायणगाव तसेच परिसरातील प्रवाशांसाठी ही सुविधा निश्चितच महत्त्वपूर्ण ठरणार असून, नागरिकांच्या प्रवासाची सोय अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे.

यावेळी जुन्नर तालुक्याचे आमदार शरददादा सोनवणे, शिवसेना तालुका प्रमुख योगेश पाटे,कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक माऊलीशेठ खंडागळे, नारायणगाव शिवसेना शहरप्रमुख संतोषदादा वाजगे, विकास नाना तोडकरी,युवा सेना जिल्हाप्रमुख सचिनशेठ घोलप,उपतालुकाप्रमुख भागेश्वर डेरे,सचिनशेठ वाळुंज, अजित वाजगे,निलेशभाऊ गोरडे आदी मान्यवर उपस्थित होते.



## थोडक्यात पण महत्वाचे

### संदीप कानपिळे यांची बँक प्रतिनिधी म्हणून निवड

**चाकण : दैनिक संध्या**



चाकण येथील चक्रेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष व युवा उद्योजक संदीप मधुकर कानपिळे यांची पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी बँक प्रतिनिधी म्हणून सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. चक्रेश्वर पतसंस्थेचे संस्थापक - संचालक ज्ञानेश्वर केळकर यांनी कानपिळे यांच्या नावाची अधिकृतपणे घोषणा केली. यावेळी संस्थेच्या सचिव जाहिरा मुंढे, उपाध्यक्ष अनिल गोसावी, चाकण ग्रामपंचायतीचे माजी सरपंच दत्तात्रय बिरदवडे, माजी सदस्य पांडुरंग गोरे, माजी सदस्या नीता केळकर, उद्योजक ऋषिकेश धाडगे, नगरसेवक विकास धाडगे, युवा सेनेचे शहर उपप्रमुख उमेश गोरे, उद्योजक रमेश देशमुख, हेमंत बिरदवडे आदी उपस्थित होते. बँक प्रतिनिधी म्हणून निवड झाल्याबद्दल ज्ञानेश्वर केळकर यांच्या हस्ते संदीप कानपिळे यांचा सन्मान करण्यात आला. प्रियंका जाधव यांनी स्वागत केले. जाहिरा मुंढे यांनी आभार मानले.

### नितीनभाऊ गोरे यांची संचालकपदी पुन्हा वर्णी

**चाकण : दैनिक संध्या**



महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य तथा चाकण नगरपरिषदेचे नगरसेवक नितीनभाऊ गुलाबराव गोरे यांची खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या संचालकपदी सन २०२६ ते २०३१ या कालावधीसाठी पुनश्च निवड करण्यात आली. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्रजी बुट्टे पाटील व राजगुरुनगरचे माजी सरपंच शांताराम बापू घुमटकर यांच्या हस्ते नितीनभाऊ गोरे यांचा सन्मान करण्यात आला. नितीनभाऊ गोरे हे खेडचे माजी आमदार स्व. सुरेशभाऊ गोरे यांचे बंधू, तर चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनीषाताई गोरे यांचे दीर आहेत. नितीनभाऊ गोरे यांनी स्व.आ. सुरेशभाऊ गोरे प्रतिष्ठानच्या माध्यमातून अनेक लोकोपयोगी कामे केली आहेत. संपूर्ण खेड तालुक्यात एक संयमी आणि धाडसी नेतृत्व म्हणून नितीनभाऊ गोरे यांनी नावलौकिक मिळविल्यामुळे चाकण नगरपरिषदेच्या नगरसेवकपदी त्यांची बिनविरोध निवड झाली. चाकण येथील स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्था व स्व.आ. सुरेशभाऊ गोरे कनिष्ठ महाविद्यालयाच्या कार्यकारिणीवर ते कार्यरत आहेत. स्व.आ. सुरेशभाऊ गोरे यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून चाकण नगरपरिषदेच्या माध्यमातून नितीनभाऊ गोरे हे सर्वांना बरोबर व विश्वासात घेत चाकण शहराच्या विकासाला गती देत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या संचालकपदी त्यांना पुन्हा काम करण्याची संधी मिळाली.

### भगवे वादळ वर्धापन दिन पुरस्कार सोहळा मुंबईत; ३० ऑक्टोबरपर्यंत प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

**मुंबई : दैनिक संध्या**

मुंबई येथील साप्ताहिक भगवे वादळच्या ५ व्या वर्धापन दिनानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय आणि प्रेरणादायी कार्य करणाऱ्या मान्यवर व्यक्तींना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. हा भव्य पुरस्कार सोहळा नोव्हेंबर २०२६ मध्ये मुंबई येथे मान्यवरांच्या हस्ते मोठ्या दिमाखात संपन्न होणार आहे. साप्ताहिक भगवे वादळ परिवारातर्फे यंदा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न पुरस्कार, प्रबोधनकार ठाकरे उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार, लोकमान्य अण्णाभाऊ साठे साहित्यरत्न पुरस्कार, बहिणाबाई चौधरी साहित्यभूषण पुरस्कार, आचार्य अत्रे उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार, महात्मा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार व सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर स्त्री शक्ती पुरस्कार, संत गाडगेबाबा समाजसेवा पुरस्कार, कर्मवीर भाऊराव पाटील शिक्षण महर्षी पुरस्कार, भारतरत्न लता मंगेशकर कला गौरव पुरस्कार, मेजर ध्यानचंद क्रीडा भूषण पुरस्कार, डॉ. नरेंद्र दाभोलकर निर्भय पत्रकारिता पुरस्कार, डॉ. प्रकाश आमटे आरोग्यदूत पुरस्कार आणि संत तुकाराम महाराज लोककला भूषण पुरस्कार असे विविध पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. सामाजिक, शैक्षणिक, साहित्य, कला, क्रीडा, आरोग्य, पत्रकारिता, प्रशासकीय सेवा, उद्योजकता, पर्यावरण व महिला सक्षमीकरण या विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना हे पुरस्कार दिले जाणार आहेत. इच्छुकांनी आपले संपूर्ण कार्य, माहिती, फोटो व ओळखपत्रासह प्रस्ताव दिनांक ३० ऑक्टोबर २०२६ पर्यंत साप्ताहिक भगवे वादळचे संपादक दत्ता खंदारे यांच्या ९६९९३१३६२१ या व्हॉट्सॲप क्रमांकावर पाठवावा. पात्र व्यक्तींची निवड परीक्षक मंडळामार्फत करण्यात येणार असून अधिक माहितीसाठी वरील क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन साप्ताहिक भगवे वादळ परिवारातर्फे करण्यात आले आहे.

### मुख्यमंत्री फडणवीस यांच्या निर्देशानंतर 'सहयोगी व आरोग्यसेवा परिषद स्थापनेच्या कार्यवाहीला गती

**मुंबई : दैनिक संध्या**

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानंतर आता 'महाराष्ट्र राज्य सहयोगी व आरोग्यसेवा परिषदे'च्या स्थापनेला आणि तिच्या प्रभावी अंमलबजावणीला मोठी गती देण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यातील आरोग्यसेवा व्यावसायिकांचे शिक्षण, प्रशिक्षण आणि नियमन अधिक सक्षम व जागतिक दर्जाचे होणार आहे. राज्यातील वैद्यकीय शिक्षण क्षेत्राला अधिक दर्जेदार आणि प्रगत बनविण्याच्या दिशेने हा निर्णय महत्वपूर्ण ठरणार आहे. राज्यातील सहयोगी व आरोग्यसेवा व्यावसायिकांसाठी उत्तम दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने १० ऑक्टोबर २०२४ रोजी या परिषदेच्या स्थापनेची अधिसूचना निर्गमित करण्यात आली होती. तसेच, या परिषदेचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी आवश्यक नियमावलीही तयार करण्यात आली आहे. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे, राष्ट्रीय स्तरावरील अद्ययावत अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून संपूर्ण महाराष्ट्रात लागू करण्याच्या दृष्टीने वेगाने पावले उचलली जात आहेत. यामुळे राज्यातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय दर्जाचे शिक्षण आणि प्रशिक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आरोग्यसेवेचा दर्जा उंचावण्यासाठी आणि कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी या परिषदेअंतर्गत चार महत्त्वपूर्ण स्वायत्त मंडळांची स्थापना केली जाणार आहे. पदवीपूर्व सहयोगी व आरोग्यसेवा शिक्षण मंडळ, पदव्युत्तर सहयोगी व आरोग्यसेवा शिक्षण मंडळ, सहयोगी व आरोग्यसेवा व्यवसाय मूल्यांकन व मानांकन मंडळ आणि सहयोगी व आरोग्यसेवा व्यवसाय आचारसंहिता व नोंदणी मंडळांची स्थापना करण्यात येणार आहे. सध्या या व्यावसायिकांच्या नोंदणी प्रक्रियेबाबत केंद्राच्या मार्गदर्शक तत्वांच्या मान्यतेची प्रक्रिया पूर्ण झाली असून ३१ ऑगस्ट २०२६ रोजी याबाबतची अधिसूचना प्रसिद्ध झाली आहे. यामुळे पुढील कार्यवाही सुरू करण्यासाठी राज्य शासन पूर्णपणे सज्ज झाले आहे. महाराष्ट्रात फिजिओथेरपिस्ट, रेडियोग्राफर, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, नेत्रतज्ज्ञ, आहारतज्ज्ञ आणि इतर ५० हून अधिक विषयांचे मोठ्या प्रमाणात प्रशिक्षण घेता येणार आहे. याचीही प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित यंत्रणांमध्ये योग्य समन्वय साधून या परिषदेचे कामकाज अधिक प्रभावीपणे राबविण्यावर भर दिला जात आहे. या ऐतिहासिक कार्यवाहीमुळे राज्याच्या सहयोगी व आरोग्यसेवा क्षेत्रात दर्जेदार व्यावसायिक मानके, उत्तम आचारसंहिता, योग्य मूल्यांकन आणि एक अत्यंत सक्षम व उत्तरदायी व्यवस्था निर्माण होण्यास मोठी चालना मिळणार आहे. भविष्यात राज्याच्या आरोग्य व्यवस्थेसाठी आणि रुग्णांच्या सेवेसाठी हा निर्णय एक मोठा मैलाचा दगड ठरणार आहे!

# पाण्यावर जगणारा समाज : पारंपरिक मच्छीमारांच्या अस्तित्वाचा आणि सामाजिक न्यायाचा प्रश्न

**एखाद्या समाजाची ओळख केवळ त्याच्या व्यवसायावरून होत नाही; त्या व्यवसायाशी जोडलेली त्याची संस्कृती, जीवनपद्धती, ज्ञानपरंपरा, सामाजिक संबंध आणि अस्तित्वाची जाणीव यांचा एकत्रित विचार केला तरच त्या समाजाचे वास्तव समजते. महाराष्ट्रातील पारंपरिक मच्छीमार समाजाकडे पाहताना हीच व्यापक दृष्टी आवश्यक आहे. मासेमारी हा या समाजासाठी केवळ उदरनिर्वाहाचा व्यवसाय नाही. नदी, तलाव, धरण आणि समुद्र हे त्याच्या जीवनविश्वाचा अविभाज्य भाग आहेत. पाण्याचा प्रवाह, ऋतूंचे बदल, माशांच्या प्रजाती, त्यांचे प्रजनन, जलाशयातील परिस्थिती, हवामान आणि बाजारपेठ यांचा अनुभव पिढ्यान्‌पिढ्या हस्तांतरित होत आला आहे. त्यामुळे मच्छीमाराकडे केवळ श्रम करणारा कामगार म्हणून न पाहता, जलपरिसंस्थेचे स्थानिक ज्ञान जपणारा एक महत्त्वाचा सामाजिक घटक म्हणून पाहणे गरजेचे आहे.**

आज या पारंपरिक जीवनपद्धतीसमोर अनेक प्रश्न उभे आहेत. आणि हे प्रश्न स्वतंत्र-स्वतंत्र नसून एकमेकांशी जोडलेले आहेत. जलस्रोतांमध्ये होणारे बदल, मत्स्यसंपत्तीतील घट, प्रदूषण, हवामानातील अनिश्चितता, मासेमारीच्या क्षेत्रावरील मर्यादा, वाढता खर्च, बाजारपेठेतील अस्थिरता, ठेका पद्धती, प्रशासकीय प्रक्रिया आणि विकासाच्या नावाखाली येणारे विविध प्रकल्प या सर्वांचा एकत्रित परिणाम मच्छीमारांच्या जीवनावर होत आहे.

प्रश्न केवळ मासेमारीचा नाही; तो अस्तित्वाचा आहे. मच्छीमारांच्या प्रश्नाकडे आपण केवळ "मासे पकडण्याचा व्यवसाय" या मर्यादित चौकटीत पाहिले, तर या समस्येचे गांभीर्य आपल्या लक्षात येणार नाही.

ज्या कुटुंबाची अनेक पिढ्यांची उपजीविका एखाद्या नदीशी किंवा जलाशयाशी जोडलेली आहे, त्याच्यासाठी त्या जलाशयातील बदल म्हणजे रोजगारातील बदल असतो. रोजगारातील बदल म्हणजे उत्पन्नातील अनिश्चितता; आणि उत्पन्नातील अनिश्चितता म्हणजे शिक्षण, आरोग्य, घर, कर्ज, विवाह आणि पुढील पिढीच्या भवितव्याशी संबंधित असुरक्षितता. म्हणूनच मच्छीमारांचा प्रश्न आर्थिक प्रश्नापासून सामाजिक प्रश्नाकडे आणि सामाजिक प्रश्नापासून मानवी प्रतिष्ठेच्या प्रश्नाकडे जातो.

धरणांची निर्मिती, नदीच्या प्रवाहातील बदल, पाण्याच्या पातळीतील चढ-उतार, गाळ साचणे, जलप्रदूषण, जलवनस्पतींची वाढ आणि जलपरिसंस्थेतील बदल यांचा थेट परिणाम मत्स्यसंपत्तीवर होतो.

मच्छीमारासाठी पाण्याची पातळी ही केवळ जलसाठ्याची आकडेवारी नसते. ती त्याच्या रोजच्या उत्पन्नाशी संबंधित असते. जलाशयातील पर्यावरणीय बदलांचा अभ्यास करताना त्यामुळे एक महत्त्वाचा प्रश्न विचारावा लागतो— जलसंपत्तीचा विकास होत असताना त्या जलसंपत्तीवर जगणाऱ्या समाजाचे काय होते? हा प्रश्न विचारल्याशिवाय जलव्यवस्थापन पूर्ण होऊ शकत नाही. प्रदूषणाची किंमत कोण मोजणार?

जलप्रदूषणाचा परिणाम सर्वांवर होतो; परंतु त्याची आर्थिक किंमत सर्वांना समान प्रमाणात मोजावी लागत नाही.पाणी प्रदूषित झाले, मत्स्यसंपत्ती कमी झाली किंवा माशांच्या प्रजननावर परिणाम झाला तर मच्छीमाराच्या हातातील उत्पन्नाचे साधन कमी होते. त्याच्याकडे पर्यायी भांडवल, मोठी उद्योगव्यवस्था किंवा दुसरी सुरक्षित रोजगारव्यवस्था असेलच असे नाही. येथे पर्यावरणीय नैतिकतेचा प्रश्न निर्माण होतो.

नैसर्गिक संसाधनांचा वापर करण्याचा अधिकार ज्यांचा आहे, त्याचबरोबर त्या संसाधनांच्या ऱ्हासाची जबाबदारीही समाजाने स्वीकारली पाहिजे. निसर्गाचा वापर हा विकासाचा भाग असू शकतो; पण निसर्गाचा ऱ्हास हा विकासाची अपरिहार्य किंमत मानता येणार नाही.

मच्छीमार समाजासमोरील आणखी एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे जलाशयातील मासेमारी व्यवस्थापन. प्रशासनाच्या दृष्टीने ठेका, निविदा किंवा ई-टेंडर या व्यवस्थापनाच्या पद्धती असू शकतात. परंतु प्रशासनिक कार्यक्षमता आणि सामाजिक न्याय या दोन गोष्टी नेहमी एकच असतील असे नाही.

ज्या व्यक्ती किंवा समाजाने पिढ्यान्‌पिढ्या त्या जलस्रोतावर आपली उपजीविका उभी केली आहे, त्याच्या पारंपरिक हक्कांचा आणि आर्थिक हिताचा विचार न करता केवळ आर्थिक व्यवहाराच्या निकषावर निर्णय घेतला तर प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. म्हणूनच कोणत्याही जलाशयाच्या मासेमारी व्यवस्थापनात पारदर्शकता, स्थानिक सहभाग, सामाजिक परिणामांचा विचार आणि पारंपरिक मच्छीमारांच्या हिताचे संरक्षण ही मूलभूत तत्त्वे असली पाहिजेत.

'विकास' या संकल्पनेची फेरचिकित्सा आवश्यक आहे. आज विकास म्हणजे मोठे प्रकल्प, मोठी गुंतवणूक, ऊर्जा निर्मिती, पायाभूत सुविधा आणि आर्थिक वाढ, अशी सर्वसाधारण धारणा तयार झाली आहे. परंतु तत्त्वज्ञान आपल्याला एक मूलभूत प्रश्न विचारायला शिकवते— विकासाचा अंतिम उद्देश काय? जर एखादा प्रकल्प आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरत असेल, परंतु त्याच्या परिणामामुळे एखाद्या समुदायाची पारंपरिक उपजीविका, सामाजिक सुरक्षितता किंवा पर्यावरणीय संतुलन धोक्यात येत असेल, तर त्या विकासाचे मूल्यांकन केवळ आर्थिक निकषांवर करता येईल का? खरा विकास हा केवळ GDP, गुंतवणूक किंवा उत्पादनवाढीत मोजला जाऊ नये. मानवी प्रतिष्ठा, सामाजिक न्याय, पर्यावरणीय संतुलन आणि भविष्यातील पिढ्यांचे हित यांचाही विकासाच्या संकल्पनेत समावेश असला पाहिजे.

**निर्णयप्रक्रियेत मच्छीमारांचा आवाज कुठे आहे?**

जलस्रोतांशी संबंधित निर्णय घेताना तांत्रिक आणि प्रशासकीय तज्ज्ञांची भूमिका निश्चितच महत्त्वाची आहे. परंतु स्थानिक मच्छीमारांचे अनुभवजन्य ज्ञानही तितकेच महत्त्वाचे आहे. कोणत्या काळात कोणती मासळी उपलब्ध होते, कोणत्या भागात प्रजनन होते, पाण्याच्या बदलत्या परिस्थितीचा मत्स्यसंपत्तीवर



काय परिणाम होतो, कोणत्या पद्धतीमुळे जलसंपत्तीचे नुकसान होते—या प्रश्नांची उत्तरे अनेकदा स्थानिक अनुभवात दडलेली असतात. त्यामुळे "लोकांसाठी निर्णय" यापेक्षा "लोकांच्या सहभागातून निर्णय" ही लोकशाहीची अधिक प्रगल्भ भूमिका आहे. मच्छीमारांना निर्णयप्रक्रियेत सहभागी करणे म्हणजे प्रशासनावर उपकार करणे नव्हे; तो त्यांच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या निर्णयांमध्ये त्यांना मिळणारा लोकशाही अधिकार आहे.

मच्छीमाराचे उत्पन्न निश्चित पगारासारखे नसते. मासळीचे प्रमाण, हवामान, पाण्याची परिस्थिती आणि बाजारभाव यावर त्याचे उत्पन्न अवलंबून असते. त्याच वेळी जाळी, होडी, इंजिन, इंधन, बर्फ, वाहतूक आणि बाजारपेठेतील विविध खर्च वाढत आहेत. मासे पकडणारा मच्छीमार हा संपूर्ण आर्थिक साखळीतील सर्वात महत्त्वाचा घटक असला तरी त्याला मिळणारा अंतिम आर्थिक लाभ अनेकदा मर्यादित राहतो. त्यामुळे मासे पकडण्यापासून थेट ग्राहकापर्यंतची मूल्यसाखळी मच्छीमारांच्या हातात आणणे ही भविष्यातील मोठी गरज आहे.

मच्छीमार सहकारी संस्था, मत्स्यप्रक्रिया उद्योग, शीतसाखळी, थेट विक्री, ब्रँडिंग आणि आधुनिक बाजारव्यवस्था यांचा विकास झाला तर पारंपरिक व्यवसायाला आधुनिक आर्थिक बळ मिळू शकते.आज मच्छीमार समाजातील तरुणांसमोर एक वेगळे द्वंद्व आहे. एकीकडे त्यांना आपल्या पारंपरिक व्यवसायाचा अभिमान आहे; दुसरीकडे शिक्षण घेऊन आधुनिक क्षेत्रांमध्ये पुढे जाण्याची आकांक्षा आहे. मच्छीमार समाजातील मुलांनी शिक्षण, प्रशासन, उद्योग, तंत्रज्ञान, संशोधन, सहकार, राजकारण आणि सामाजिक नेतृत्व या क्षेत्रांत पुढे जाणे आवश्यक आहे. कारण समाजाचे भविष्य केवळ जलाशयात नाही; ते ज्ञानातही आहे.

मच्छीमारांचा पर्यावरणाशी संबंध मूलतः संघर्षाचा नसून सहजीवनाचा आहे. जलसंपत्ती टिकली तरच त्यांचा व्यवसाय टिकणार आहे. म्हणूनच पारंपरिक मच्छीमारांना पर्यावरणीय संवर्धनाच्या प्रक्रियेत भागीदार बनविणे आवश्यक आहे. जलाशयाचे संवर्धन, मत्स्यप्रजातींचे संरक्षण, प्रदूषण नियंत्रण, शाश्वत मासेमारी आणि जैवविविधतेचे रक्षण यामध्ये मच्छीमारांचा प्रत्यक्ष सहभाग घेतला तर पर्यावरण संरक्षणाला स्थानिक पातळीवर अधिक प्रभावी आधार मिळू शकतो.

लोकशाही राज्यव्यवस्थेचे अंतिम उद्दिष्ट नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा करणे हे आहे. त्यामुळे शासनाने मच्छीमारांकडे केवळ परवानगी घेणारा किंवा योजना मागणारा लाभार्थी म्हणून न पाहता जलसंपत्तीचा भागीदार म्हणून पाहणे आवश्यक आहे. धोरण तयार करताना स्थानिक वास्तव समजून घेणे, निर्णयापूर्वी संवाद साधणे, सामाजिक परिणामांचे मूल्यांकन करणे, पारदर्शक व्यवस्था निर्माण करणे आणि निर्णयानंतर परिणामांचे पुनर्मूल्यांकन करणे ही चांगल्या प्रशासनाची लक्षणे आहेत. मच्छीमारांसाठी स्वतंत्र पायाभूत सुविधा, बाजारपेठ, आर्थिक सहाय्य, विमा, प्रशिक्षण, आधुनिक मत्स्यतंत्रज्ञान आणि सहकाराच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरण या बाबींकडे दीर्घकालीन दृष्टीने पाहण्याची गरज आहे.

मच्छीमारांच्या प्रश्नाकडे केवळ एका समाजाच्या प्रश्नाप्रमाणे पाहणे ही देखील एक चूक आहे.

नदीतील मासे बाजारात आले की त्यातून व्यापाऱ्याला रोजगार मिळतो. मासळी विकली जाते तेव्हा विक्रेत्याला उत्पन्न मिळते. वाहतूकदार, बर्फ विक्रेते, मासे कापणारे कामगार, हॉटेल व्यवसाय आणि अनेक लहान व्यावसायिक या साखळीशी जोडलेले असतात. म्हणून पारंपरिक मत्स्य व्यवसायाचे संरक्षण म्हणजे ग्रामीण अर्थव्यवस्थेतील एका संपूर्ण उपजीविका-साखळीचे संरक्षण होय.

पाण्याचा प्रश्न शेवटी माणसाचा प्रश्न आहे. नदी ही केवळ पाण्याचा प्रवाह नाही. धरण हे केवळ पाण्याचा साठा नाही. मासे हे केवळ बाजारातील वस्तू नाहीत. आणि मच्छीमार हा केवळ श्रम करणारा मनुष्य नाही. या सर्वांमध्ये एक परस्परसंबंधित जीवनव्यवस्था आहे. म्हणूनच आजचा प्रश्न असा नाही की मच्छीमारांना बदलत्या काळाशी जुळवून घेता येईल का? प्रश्न असा आहे की बदलत्या काळाच्या नावाखाली आपण त्यांना त्यांच्या जीवनाच्या आधारापासून वंचित तर करत नाही ना? विकास हवा; परंतु तो माणसाला विस्थापित करणारा नसावा. आधुनिकीकरण हवे; परंतु ते परंपरेचे अस्तित्व नष्ट करणारे नसावे. जलसंपत्तीचा वापर हवा; परंतु तिच्या मूळ हितधारकांना बाजूला सारून नव्हे. शासनाचे धोरण हवे; परंतु त्या धोरणात माणसाचा चेहरा दिसला पाहिजे. कारण जलस्रोतांचे खरे मूल्य त्यांच्या पाण्यात नसते; त्या पाण्यावर किती जीवन जगते, किती कुटुंबे उभी राहतात आणि किती पिढ्यांचे भविष्य त्याच्याशी जोडलेले आहे, यात असते. पारंपरिक मच्छीमार समाजाचा प्रश्न म्हणून त्यामुळे आपण एक व्यापक प्रश्न स्वीकारला पाहिजे— "विकासाच्या प्रवाहात माणूस केंद्रस्थानी राहणार आहे की माणसाला प्रवाहाबाहेर केले जाणार आहे?" या प्रश्नाचे उत्तरच आपल्या जलधोरणाचे, विकासनीतीचे आणि सामाजिक न्यायाचे खरे मूल्य ठरवेल.



प्रा. कृष्णात जयवंत नगरे
तत्त्वज्ञान आणि तर्कशास्त्र विभाग प्रमुख,
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय बारामती

## विनापरवाने कुत्री पाळणाऱ्यांवर व निष्काळजीपणा करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करा

**■ पिंपरी : (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड शहरात फक्त चारशे नागरिकांनी आपल्या महानगरपालिकेचा रितसर परवाना घेवुन कुत्री पाळलेली आहेत. मात्र शहरात आज रोजी सुमारे ७० ते ७५ हजार नागरिकांनी विनापरवाना कुत्री पाळलेली आहेत. त्या विनापरवाना पाळलेल्या कुत्र्यांची योग्य निगा राखली जात नाही. त्यांना वेळोवेळी लसीकरण केले जात नाही. अशी कुत्री चावल्यास रेबीज होतो व नाहक नागरिकांचा जीव जातो. त्यामुळे अशा विनापरवाना कुत्री पाळनाऱ्या नागरिकांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत व कुत्री पाळण्याचा परवाना असून निष्काळजीपणा करणाऱ्यांवर हि फौजदारी गुन्हे दाखल करावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते गणेश जगताप यांनी महापालिका आयुक्त डॉ विजय सुर्यवंशी यांना निवेदन देऊन केली आहे.

विनापरवाना घरे बांधणारे, विनापरवाना नळ कनेक्शन जोडणारे यांच्यावर फौजदारी कारवाई केली जाते. तोच नियम या विनापरवाना कुत्री पाळणाऱ्या नागरिकांना लावुन त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी असे पत्रात म्हटले आहे.



पिंपरी चिंचवड शहरातील झोपडपट्टीत नागरिकांना राहण्यासाठी पुरेशी जागा नसते, तरी ही घरात कुत्री पाळली जातात व घरात पुरेशी जागा नसल्याने ती कुत्री रस्त्यांवर सोडली जातात. तसेच त्याची योग्य निगा राखली जात नाही कि त्यांना वेळेवर लसीकरण केले जात नाही. हिच परिस्थिती चाळीत व घरकुल तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील इमारतीत आहे. राहायला जागा कमी असतांना तिथे कुत्री पाळली जातात, त्यांच्या गळयात पट्टा बांधला जात नाही. घरात जागा नसल्यानी त्यांना बाहेर रस्त्यावर मोकळे सोडले जाते मग त्या कुत्र्यांच्या गल्लीत रस्त्यावर झुंडी तयार होतात. वृध्दांच्या अंगावर धावुन येतात. नागरिकांचे व लहान बालकांचे लचके तोडतात. सायकलस्वार व दुचाकी चालवणाऱ्यांच्या मागे लागतात. त्यामुळे अपघात होऊन मनुष्याची जिवित हानी पण होते. मात्र याची परवा हे विना परवाना कुत्री पाळणारे करत नाहीत. त्यामुळे विनापरवाना कुत्री पाळणा-यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत.

## AIMS इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजमध्ये 'प्रारंभ २०२६' इंडक्शन कार्यक्रम उत्साहात




**■ पुणे (दै. संध्या)**

"आजच्या काळात केवळ नोकरी मिळवणे महत्त्वाचे नसून, मिळालेली नोकरी टिकवणे आणि त्यामध्ये सातत्याने प्रगती करणे अधिक महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांना केवळ पदवी देण्यापेक्षा त्यांना प्रत्यक्ष क्षेत्रातील अनुभव आणि व्यावहारिक ज्ञानावर आधारित शिक्षण देणे ही शैक्षणिक संस्थांची जबाबदारी आहे. चुका करण्यास घाबरू नका; मात्र प्रत्येक चुकीतून शिकत राहा आणि बदलत्या काळानुसार नवनवीन गोष्टी आत्मसात करा," असा सल्ला AIMS इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजचे चेअरमन डॉ. मनीष सिन्हा यांनी विद्यार्थ्यांना दिला.

कृष्णा एज्युकेशनल ट्रस्टच्या AIMS इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजच्या २०२६-२८ या बॅचसाठी 'प्रारंभ २०२६' या इंडक्शन कार्यक्रमाचे आयोजन सोमवार, दि. २१ सप्टेंबर रोजी येवलेवाडी कॅम्पस येथे करण्यात आले. यावेळी डॉ. मनीष सिन्हा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमास निवृत्त लेफ्टनंट कर्नल समीर कुलकर्णी, मानसशास्त्रज्ञ बोल्लमपल्ली सत्यप्रकाश यांच्यासह संस्थेचे प्राध्यापक, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

'प्रारंभ २०२६' या उपक्रमाच्या माध्यमातून नव्या विद्यार्थ्यांना AIMSच्या शैक्षणिक वातावरणाशी परिचित करून देतानाच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला आणि भविष्यातील व्यावसायिक वाटचालीला सकारात्मक दिशा देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांचे स्वागत, संस्थेची वाटचाल, व्यवस्थापन शिक्षणाची ओळख, नेतृत्वगुणांचा विकास तसेच व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध मार्गदर्शनपर आणि प्रेरणादायी सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### देवस्थान इनाम धारकांचा रविवारी महामेळावा

**पुणे : दैनिक संध्या**

राज्यातील देवस्थान इनाम धारक शेतकऱ्यांच्या इनामी जमिनीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. राज्य सरकारने जून महिन्यात देवस्थान इनाम निर्मूलन कायदा २०२६ प्रस्तावित केला होता. या कायद्याबाबत इनाम धारक शेतकऱ्यांच्या मनात मोठी साशंकता आहे. त्यामुळे देवस्थान इनाम जमीन कृती समिती च्या वतीने रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी बोरमलनाथ देवस्थान चौफुला दौंड येथे इनाम धारक शेतकऱ्यांच्या महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती आयोजन समितीतील परशुराम हिंदू सेवा संघाचे अध्यक्ष विश्वजीत देशपांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. पत्रकार परिषदेला अखिल भारतीय गुरव समाज संघटना कार्याध्यक्ष शितल शिंदे, दशनाम गिरी गोसावी संघटना जिल्हाध्यक्ष नंदकुमार गोसावी आदी उपस्थित होते. विश्वजीत देशपांडे म्हणाले, महामेळाव्याला विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार राहुल कुल आदी उपस्थित राहणार आहेत. देवस्थान इनाम वर्ग दोन व वर्ग तीन जमिनी खालसा करून वर्ग एक स्वरूपात इनाम धारकांना देण्यात याव्या. वंशपरंपरागत प्रलंबित नोंदी लवकरात लवकर करण्यात याव्या. बेकायदेशीर रित्या हस्तांतरण झालेल्या जमिनी लँडमाफियांच्या ताब्यातून काढून इनामधारकांना देण्यात याव्या. बीपीटी कायद्यातून इनाम जमिनी वगळण्यात याव्या, कारण हे महसुली इनाम आहेत ज्याचा ट्रस्टशी काहीही संबंध नाही, अशा समितीच्या प्रमुख मागण्या आहेत. शितल शिंदे म्हणाले, देवस्थान इनाम निर्मूलन कायदा २०२६ चा मसुदा हा इनामदारकांनी घेतलेल्या आक्षेपांमुळे सरकारला परत घ्यावा लागला होता. त्यानंतर महाराष्ट्र सरकारने देवस्थान इनाम निर्मूलन कायदा तयार करण्यासाठी राज्याचे महसूल विभागाचे सचिव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित केली आहे. येत्या डिसेंबर महिन्यात कायदा विधानसभेसमोर येणे अपेक्षित आहे. नंदकुमार गोसावी म्हणाले, सन १९५३ साली इनाम अबोलिशमेंट कमिशन स्थापन झाले होते. त्यावेळी इतर सर्व इनाम जमिनी खालसा करून त्या त्या इनामदारकांच्या नावे केले गेल्या होत्या. परंतु देवस्थान इनाम जमिनी इनाम धारक शेतकऱ्यांना दिल्या गेल्या नाही. राज्यात विविध भागात देवस्थान इनाम संदर्भात विविध कायदे व नियम आहेत, त्यामध्ये एकसूत्रता नाही. त्यामुळे राज्यातील देवस्थान इनाम धारक शेतकरी प्रचंड अडचणीत सापडलेला आहे. त्यांना पीक कर्ज मिळत नाही, पिक विमा मिळत नाही, शासनाची कोणतीही मदत मिळत नाही, वारस नोंदणीचा प्रश्न देखील गंभीर झाला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर सरकारने आणलेलं कायदा हा २०११ पूर्वी अनधिकृत ताबा घेतलेल्या लँड माफियांच्या फायद्याचा होता. त्यामुळे या शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी देवस्थान इनाम कृती समिती प्रयत्नशील असून ब्राह्मण, गुरव, गिरी गोसावी, बैरागी, वैष्णव, गोंधळी, लिंगायत अशा विविध समाजातील इनामदार शेतकऱ्यांची ही कृती समिती तयार केली आहे. राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन व धरणे आंदोलन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या हिताचा कायदा तयार करण्यासाठी देवस्थान इनाम जमीन कृती समिती कार्यरत असल्याचे समितीचे समन्वयक ॲड. अण्णासाहेब शिंदे, विश्वजीत देशपांडे, ओमप्रकाश गिरी, राजेंद्र बन यांनी सांगितले.



### 'विद्या गणेश' अंतर्गत आनंदवनच्या शाळेसाठी १ हजार वह्यांचा गणरायाला नैवेद्य

**पुणे : दैनिक संध्या**

सामाजिक बांधिलकी आणि शिक्षण प्रसाराचा वसा जपणाऱ्या नारायण पेठ माती गणपती मंडळ ट्रस्ट तर्फे यंदा गणेशोत्सवात 'विद्या गणेश' हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. त्यामध्ये गणेशभक्तांच्या सहभागातून एक रेघी १ हजार नवीन वह्यांचा गणरायाला नैवेद्य दाखविण्यात आला. 'गणपती सर्वांचा आहे' आणि 'विद्या हाच खरा प्रसाद' या भावनेतून संकलित केलेल्या या १ हजार नवीन कोऱ्या वह्या महाराष्ट्रातील प्रसिद्ध सामाजिक संस्था महारोगी सेवा समिती, वरोरा - आनंदवन (बाबा आमटे) येथील शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहेत. सामाजिक सहभागातून श्री माती गणपती बाप्पाला या नवीन वह्यांचा अनोखा नैवेद्य अर्पण करण्यात आला. शिक्षणापासून कोणतेही मूल वंचित राहू नये, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. पुणेकरांच्या उदंड प्रतिसादामुळे हा उपक्रम यशस्वी झाला. पुणेकरांच्या सक्रिय सहभागामुळे हा गणेशाचा विद्या रुपी प्रसाद गरजू विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणार आहे, अशी भावना मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी व्यक्त केली.

### गणेशोत्सवाने फिरवले २ हजार कोटींचे अर्थचक्र!




**पुणे : दैनिक संध्या**

लाडक्या गणरायाच्या पाहुणचारात कोणतीही कसूर राहू नये म्हणून पुणेकरांनी यंदाही मुक्तहस्ते खर्च केला. गणेशमूर्ती, मखर, पूजासाहित्य, फुले-फळे, नारळ, मोदक-मिठाईपासून सोने-चांदीच्या अलंकारांपर्यंत खरेदीचा जोर राहिला. त्यात सार्वजनिक मंडळांचे भव्य मंडप, देखावे, विद्युतरोषणाई, ढोल-ताशा, डीजे आणि विसर्जन मिरवणुकीच्या खर्चाची भर पडली. त्यामुळे यंदाच्या गणेशोत्सवाने पुण्यातील बाजारपेठेत दोन हजार कोटी रुपयांचे अर्थचक्र फिरवल्याचा अंदाज आहे. विशेष म्हणजे, गतवर्षीच्या तुलनेत उलाढालीत २०० ते ३०० कोटी रुपयांची वाढ झाल्याचे जाणकारांनी सांगितले. शहरातील लाखो घरांमध्ये गणरायाची प्रतिष्ठापना झाली. मूर्तीपासून मखर, सजावट, पूजासाहित्य, विद्युतमाळा, तोरणे आणि अन्य साहित्यावर प्रत्येक कुटुंबाने आपल्या ऐपतीनुसार खर्च केला. त्यामुळे मूर्ती आणि घरगुती गणेशोत्सवाशी निगडित बाजारपेठेतील व्यवहार ४५० ते ५०० कोटी रुपयांच्या घरात गेल्याचा अंदाज आहे. गणरायासाठी सोन्या-चांदीचे मुकुट, हार, मोदक, दुर्वा आणि अन्य अलंकार खरेदीची परंपरा कायम राहिल्याने सराफा आणि भेटवस्तूंच्या बाजारालाही उत्सवाचा मोठा हातभार लागला. गणेश दर्शनासाठी रात्री उशिरापर्यंत रस्त्यांवर उसळलेल्या गर्दीनेही छोट्या-मोठ्या व्यावसायिकांची चांदी केली.

# खळदच्या लढ्याला अखेर यश

## पुरंदर-हवेलीचे माजी आमदार संजय चंदुकाका जगताप यांची माहिती, कऱ्हा नदीवर पाच कोटींची संरक्षण भिंत मंजूर



■ नाझरे सुपे पुरंदर (दै. संध्या)

वारंवार होणाऱ्या अतिवृष्टी आणि कऱ्हा नदीच्या महापुराच्या छायेत असलेल्या खळद गावासाठी अखेर दिलासादायक बातमी आली आहे. नदीकाठच्या गावाचे पुरापासून संरक्षण करण्यासाठी तब्बल पाच कोटी रुपयांची भक्कम संरक्षक भिंत मंजूर झाली असून, ग्रामस्थांच्या तब्बल सात ते आठ वर्षांच्या प्रदीर्घ पाठपुराव्याला यश आले आहे. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी या कामाला प्रशासकीय मान्यता दिल्याची माहिती पुरंदर-हवेलीचे माजी आमदार संजय चंदुकाका जगताप यांनी दिली.

२०१९ मध्ये कऱ्हा नदीला आलेल्या महापुराने खळद गावठाणाचे मोठे नुकसान केले होते. पुराचे रौद्ररूप धारण केलेले पाणी थेट गावात घुसल्याने अनेक घरांचे, संसारांचे आणि शेतीचे अतोनात नुकसान झाले होते. गाव जरी तुलने उंचावर वसलेले असले तरी दरवर्षी होणाऱ्या मुसळधार पावसामुळे नदीचे पात्र सातत्याने गावाच्या दिशेने सरकत आहे. त्यामुळे भविष्यात एखादी मोठी दुर्घटना घडण्याची भीती ग्रामस्थांच्या मनात होती.

त्यातही खंडोबाचीवाडी परिसरात नदीने आपले मूळ पात्र सोडून थेट शेतातून नवा प्रवाह तयार केल्याने बळीराजा पुरता उद्ध्वस्त झाला होता. उभ्या पिकांसह सुपीक जमीन वाहून गेल्याने शेतकरी हवालदिल झाले होते. तेव्हापासूनच ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांनी एकमुखाने संरक्षण भिंतीची मागणी लावून धरली होती.

या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयाने तातडीने अंदाजपत्रक तयार करण्याचे आदेश दिले होते. माजी आमदार संजय जगताप यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे हा पाच कोटींचा भरीव निधी मंजूर झाला आहे. या निर्णयामुळे खळदमध्ये समाधानाचे वातावरण असून लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार असल्याने गाव पुराच्या कायमच्या धोक्यातून मुक्त होणार आहे.

## जेजुरीत दत्त मंडळ, शौर्य मंडळाचा फेस्टिवल, जेजुरी जत्रा

### महारुद्र मंडळाच्या वतीने रक्तदान



■ जेजुरी (दै. संध्या)

राष्ट्रीय व्यावसायिक मानकांविषयी शिक्षकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि बदलत्या शैक्षणिक वातावरणात त्यांची क्षमता वाढवणे या उद्देशाने, १० आणि ११ सप्टेंबर रोजी पुण्यातील महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या (एससीईआरटी) कॅम्पसमध्ये एका राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत महाराष्ट्रभरातील जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थांमधील (डीआयईटी) शिक्षक एकत्र आले होते.

कार्यशाळेत एससीईआरटी महाराष्ट्रच्या जॉइंट डायरेक्टर डॉ. कमलादेवी आवटे, एससीईआरटी महाराष्ट्रच्या डेप्युटी डायरेक्टर (प्री-सर्व्हिस डिपार्टमेंट) अरुणा यादव, एससीईआरटी महाराष्ट्रचे असिस्टंट डायरेक्टर (प्री-सर्विस डिपार्टमेंट) बालकृष्ण वाटरकर तथा स्टरलाइट एडइंडिया फाउंडेशनचे हेड डॉ. एंटनी नेलिसरी उपस्थित होते.

ही कार्यशाळा स्टरलाइट एडइंडिया फाउंडेशनच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आली होती, जी व्यावसायिक विकास, संस्थात्मक बळकटीकरण आणि डेटा-आधारित निर्णयप्रक्रियेद्वारे भारताची सार्वजनिक शिक्षण प्रणाली मजबूत करण्यासाठी कार्य करते. या कार्यक्रमाने सहभागींना एनपीएसटी (NPST) आराखडा आणि राष्ट्रीय मानके शिक्षक क्षमता, निरंतर व्यावसायिक विकास, मार्गदर्शन, मूल्यांकन आणि करिअरमधील प्रगती यांच्याशी कशी संबंधित आहेत हे समजून घेण्याची संधी दिली. या कार्यशाळेत सहभागींना एनपीएसटी (NPST) आराखड्याचा उद्देश, रचना आणि प्रमुख घटकांविषयी माहिती देण्यात आली. राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) २०२० अंतर्गत शिक्षकांना त्यांच्या क्षमतांची समज सुधारण्यासाठी आणि व्यावसायिक विकासाची व्यापक उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी व्यावसायिक मानके किती महत्त्वपूर्ण आहेत, यावर चर्चेत लक्ष केंद्रित करण्यात आले. कार्यशाळेचे संचालन करणाऱ्या डॉ. कमलादेवी आवटे म्हणाल्या, “राष्ट्रीय व्यावसायिक मानके शिक्षकांना अध्यापनाचा दर्जा आणि व्यावसायिकता सुधारण्यासाठी एक आवश्यक चौकट प्रदान करतात. यांसारख्या कार्यशाळा डीआयईटीच्या प्राध्यापकांना या मानकांबद्दल एक समान समज विकसित करण्याची आणि शिक्षक शिक्षण व व्यावसायिक विकासातील त्यांच्या महत्त्वावर चिंतन करण्याची संधी देतात. शैक्षणिक संस्थांमध्ये जागरूकता आणि ज्ञान वाढवणे हे व्यावसायिक मानकांशी अर्थपूर्ण संलग्नतेच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.” अरुणा यादव म्हणाल्या, “या कार्यशाळेने डीआयईटीच्या प्राध्यापकांना एनपीएसटीशी संलग्न होण्याची आणि व्यावसायिक विकास व मूल्यांकनातील त्याची क्षेत्रे, क्षमता आणि महत्त्व अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्याची संधी दिली.”

## पुणे फेस्टिव्हल अंतर्गत रसिकांनी अनुभवली 'कावेरी परंपरा'




■ पुणे (दै. संध्या)

शास्त्रीय संगीतासह ललित संगीतप्रकारांचे गायन, वाद्यवादनातील नैपुण्य आणि नृत्याची पेशकश, अशी विद्यार्थ्यांची सादरीकरणे रविवारी रसिकांनी 'कावेरी परंपरा' या कार्यक्रमांतून अनुभवली. कलाक्षेत्रातील मान्यवर कलाकारांची उपस्थिती, हे या कार्यक्रमाचे एक वैशिष्ट्य ठरले.

मंत्रमुग्ध करणारी प्रस्तुती अधिश्री पोटे या विद्यार्थिनीने राग मधुवंती सादर केला. तिलवाडा तालात अब मान मना हरी हा ख्याल आणि द्रुत त्रितालातील कैसी होरी खेलत है नंदलाल ही रचना गायिली. तिला कौशिक केळकर (तबला) आणि अदिती गराडे (हार्मोनिअम) यांनी साथ केली. नील चापेकरने यमन रागात मध्यलय त्रितालातील ख्याल आणि मन राम रंगी रंगले हे नाट्यपद सादर केले. चिन्मय लेले (तबला) आणि श्रुती आकार (हार्मोनिअम) यांनी साथ केली.

श्रुती राऊतने व्हायोलीनवर राग जोगमध्ये सजन मोरो घर आये ही रचना आणि राजस्थानी धून ऐकवली. तिला शंकर कुचेकर यांनी तबल्यावर साथसंगत केली.

सायेषा चौधरीने एकल तबलावादन करताना एकताल सादर केला. पेशकार, कायदे, चक्रधार परण तिने तयारीने वाजवले. लेहरासाथ श्रुती आकारने केली.

जान्हवी भागवत आणि मैत्रेयी कुलकर्णी यांनी भरतनाट्यम आणि कथक नृत्याचे युगुल सादरीकरण केले. हनुमान स्तवन हा कथाभाग त्यांनी प्रस्तुत केला. पंतुवराली रागात आणि आदीतालात निबद्ध रचना त्यांनी सादर केली. या विद्यार्थ्यांची कलाविश्वातील ही सुरवातीची पावले अतिशय आश्वासक असल्याची खात्री पटवणारे त्यांचे सादरीकरण होते. प्रस्तुती करताना आत्मविश्वास आणि कलेचा स्वतः आनंद घेणे, विशेष उल्लेखनीय होते. त्यांच्या सादरीकरणाने रसिक मंत्रमुग्ध झाले. विद्यार्थ्यांचे कौतुक करताना, विदुषी शमा भाटे, विदुषी सुचेता चापेकर यांनी कावेरी परंपरा या उपक्रमाचे लक्षणीय योगदान सांगितले. भरत कामत आणि आनंद भाटे यांनी लहानपणीच्या आठवणींना उजाळा दिला. संगीत शिक्षक अपर्णा लेले यांनी संयोजन केले. स्नेहल कुलकर्णी आणि अश्विनी देवधर यांनी सूत्रसंचालन केले.

## स्वरमयी गुरुकुलतर्फे युवा गायकांची मैफल





■ ओतूर (दै. संध्या)

‘डॉ. प्रभा अत्रे फाउंडेशन’ संचालित 'स्वरमयी गुरुकुल'च्या वतीने 'आंतरराष्ट्रीय स्वर प्रभा गायन स्पर्धेतील' विजेत्या युवा गायकांचा विशेष हिंदुस्थानी शास्त्रीय गायन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

हा कार्यक्रम रविवार, दि. २७ सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी १० वाजता स्वरमयी गुरुकुल सभागृह, जे. एम. रोड, छत्रपती संभाजी बागेसमोर, हॉटेल शिव सागर गल्ली, पुणे येथे होणार आहे.

या मैफलीत युवा गायक श्रुती वैद्य (पुणे), तर गणेश सुनील जगदाळे (तेरखेडा) यांची गायन मैफिल होणार आहे. त्यांना तबल्यावर ऋषिकेश जगताप व संवादिनीवर संतोष अत्रे यांची साथ लाभणार आहे. श्रुती वैद्य यांनी श्री. दुश्यंत जोशी यांच्याकडून संगीताचे प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर विदुषी सावनी शेंडे-साठये यांच्याकडे प्रगत तालीम घेतली आहे. त्यांनी अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाची संगीत विशारद पदवी प्राप्त केली असून त्या एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठात संगीत विषयात एम.ए.चे शिक्षण घेत आहेत. विविध युवा महोत्सव व प्रतिष्ठित संगीत स्पर्धांमध्ये त्यांनी पारितोषिके मिळवली असून संगीत अल्बमसाठी पार्श्वगायन तसेच विविध प्रतिष्ठित मंचांवर सादरीकरण केले आहे.

गणेश सुनील जगदाळे हे हिंदुस्थानी शास्त्रीय गायक, व्यावसायिक तबला व हार्मोनियम वादक तसेच संगीत शिक्षक आहेत. त्यांनी एम.ए. (इंडियन क्लासिकल म्युझिक), संगीत विशारद तसेच मुंबई विद्यापीठाचा डिप्लोमा इन साऊंड इंजिनिअरिंग अँड म्युझिक प्रोडक्शन पूर्ण केला आहे. वयाच्या सहाव्या वर्षापासून आजोबा कै. श्री. खांडेराव तात्याबा जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांची सांगीतिक वाटचाल सुरू झाली. पं. रमाकांत गायकवाड यांच्याकडे पाच वर्षांहून अधिक काळ किराणा व पतियाळा घराण्याची तालीम त्यांनी घेतली असून श्रीमती बागेश्री पांचाळे यांच्याकडून गझल गायकीचे विशेष प्रशिक्षण घेतले आहे. पद्मश्री कैलास खेर आयोजित ‘नयी उड़ान २०२६’ राष्ट्रीय संगीत स्पर्धेचे महाविजेते म्हणून त्यांना गौरविण्यात आले आहे.

## गणेशोत्सवात महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव



■ पुणे (दै. संध्या)

गणेशोत्सवाबरोबरच समाजातील विविध क्षेत्रांत योगदान देणाऱ्या महिलांच्या कर्तृत्वाची दखल घेत मानाचा चौथा श्री तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ ट्रस्टच्या वतीने ‘एक दिवस महिलांचा’ हा उपक्रम राबविण्यात आला. महिलांच्या कलागुणांसह सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा आणि व्यावसायिक क्षेत्रातील योगदानाचा गौरव करण्यासाठी आयोजित ‘तुळशीबाग स्त्री सन्मान २०२६’ सोहळ्यात विविध क्षेत्रांत कार्यरत महिलांचा सन्मानकरण्यात आला.

श्री तुळशीबाग गणेशोत्सव मंडपात झालेल्या कार्यक्रमाला पुणे महानगरपालिकेच्या महापौर मंजुषा नागपुरे, महाराष्ट्राच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मृणालिनी हेमंत रासने, नगरसेविका व पुणे महापालिकेच्या शहर सुधारणा समितीच्या सदस्या स्वप्नाली नितीन पंडित, डॉ. शैलेश गुजर, मंडळाचे अध्यक्ष विकास पवार, उपाध्यक्ष विनायक कदम, कोषाध्यक्ष नितीन पंडित आदी उपस्थित होते. मेधा ताडपत्रीकर, शैलजा मिरजे, ॲड. रोहिणी पवार, ज्योती ढमाले, सुनंदा टिकार, महिमा ठोंबरे, स्वाती महाळंक आणि गुरमीत कौर गिल यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. सन्मानार्थींना सन्मानपत्र, शाल, श्रीफळ आणि तुळशीबाग गणपतीची प्रतिमा देऊन गौरविण्यात आले.

स्वप्नाली पंडित म्हणाल्या, गणेशोत्सवात महिलांसाठी एक दिवस समर्पित करून विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या महिलांच्या योगदानाची दखल घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. महिलांच्या कार्याची ओळख समाजासमोर यावी आणि त्यांच्या योगदानाला व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने ‘तुळशीबाग स्त्री सन्मान’ उपक्रम राबविण्यात येत आहे, असेही त्यांनी सांगितले. माधुरी मिसाळ आणि मंजुषा नागपुरे यांनी मनोगत व्यक्त केले.